रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३४९
www.ramprahar.com



(छाया : सुधीर नाझरे)

## पांडुरंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविक दाखल

**पंढरपूर : प्रतिनिधी**

आषाढी एकादशी सोहळ्यासाठी हरिनामाचा जयघोष करीत मजल दरमजल करत संतांचा पालखी सोहळा पंढरपुरात दाखल झाला आहे. लाखो वारकऱ्यांना विठ्ठलाच्या भेटीची आतुरता लागली आहे. यात्रेकरिता आलेल्या भाविकांना अत्यावश्यक सेवासुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनही अहोरात्र काम करत आहेत.



संपूर्ण पंढरपूर नगरी भक्तिरसात न्हालेली असून विठ्ठल-रखुमाईच्या महापूजेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी (दि. ५) पंढरपुरात दाखल झाले. मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस हे रविवारी पहाटे २.२० वाजता विठ्ठल-रखुमाईची शासकीय महापूजा करतील. या पवित्र क्षणासाठी पंढरपूर मंदिर परिसरात विशेष सुरक्षा व्यवस्था आणि नियोजन करण्यात आले आहे. राज्य सरकारमधील अनेक मंत्री तसेच अधिकारीवर्गही या महत्त्वपूर्ण सोहळ्यासाठी पंढरपूरात दाखल होण्याची शक्यता आहे.

सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख मार्ग, वेशी, रस्ते आणि मंदिर परिसर फुलांनी, विद्युत रोषणाईने सजवण्यात आला असून संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे. विठूरायाच्या जयघोषात, टाळ-चिपळ्यांच्या गजरात आणि पुंडलिक वरदा हरी विठ्ठलच्या जयघोषाने पंढरपूर नगरी दुमदुमली आहे.

आषाढी एकादशी ही महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण धार्मिक सण आहे. महाराष्ट्रातून लाखो वारकरी आपल्या लाडक्या पांडुरंगांच्या दर्शनासाठी पंढरपुरात पायी चालत येतात. पायी वारीत वारकरी ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता भजने म्हणत टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठल-रुख्मिणीच्या चरणी लीन होतात. यंदाही हे चित्र दिसून येत आहे.

## श्रद्धेय बाळासाहेब ठाकरेंचे आशीर्वाद मलाच मिळाले!

### मुख्यमंत्री फडणवीसांकडून राज यांचे आभार, तर उद्धव यांचा ‘रूदाली’ उल्लेख

**पंढरपूर : प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा मेळावा शनिवारी (दि. ५) मुंबईत पार पडला. या वेळी दोघांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे आम्ही एकत्र आलो असे विधान केले. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांना प्रतिक्रिया देताना राज ठाकरेंचे आभार मानले, तर उद्धव ठाकरेंचा उल्लेख ‘रूदाली’ असा केला.

‘मी राज ठाकरेंचे आभार मानतो, कारण त्यांनी दोन बंधू एकत्र येण्याचे श्रेय त्यांनी मला दिले. कुठेतरी श्रद्धेय बाळासाहेब ठाकरेंचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. मला सांगण्यात आले होते की, विजयी मेळावा होणार आहे, पण त्या ठिकाणी रूदालीचे भाषणही झाले आणि मराठीबद्दल एक शब्द न बोलता आमचे सरकार गेले, आमचे सरकार पाडले, आम्हाला सत्ता द्या, निवडून द्या हा काही मराठीचा विजय नव्हता ही रूदाली होते. या रूदालीचे दर्शन त्या ठिकाणी आपण घेतले आहे. मुळात त्यांना असूया आहे की, २५ वर्षे महापालिका असताना दाखवण्यालायक ते काहीही काम करू शकले नाहीत,’ असे



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

‘पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात आम्ही ज्या प्रकारे मुंबईचा चेहरा बदलला ते सगळ्यांनी पाहिले. त्यांच्या काळात मुंबईतला मराठी माणूस हद्दपार झाला. आम्ही बीडीडी चाळ, अभ्युदय नगर, पत्रा चाळ येथील मराठी माणसांना त्याच ठिकाणी घर दिले याची असूया त्यांच्या मनात आहे. मुंबईतला मराठी माणूस असो की अमराठी सगळेच आमच्या बरोबर आहेत. आम्ही मराठी आहोत, मराठी असण्याचा अभिमान आहे. आम्ही हिंदुत्ववादी आहोत आणि हिंदू असल्याचा आम्हाला अभिमान आहे,’ असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

***आम्ही फ्लॉवर की फायर हे पुढच्या निवडणुकीत दिसेल -एकनाथ शिंदे*** /पान २

## उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करा -आमदार प्रशांत ठाकूर

### निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू : मंत्री गुलाबराव पाटील

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील उमटे धरणातील गाळ काढण्यास खूप विलंब झाला आहे. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्यांना कायम सामोरे जाऊ लागू नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता. त्या अनुषंगाने चौथ्यांदा निविदा प्रसिद्ध करून निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू असल्याचे लेखी उत्तर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.




उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी आठ कोटी ८१ लाख ३५ हजार ६३१ इतक्या रकमेची ई-निविदा प्रसिद्ध होऊन बराच कालावधी होऊनसुद्धा अद्यापही धरणातील गाळ काढण्यासाठी विलंब होत असल्याचे मे २०२५मध्ये निदर्शनास आले. आहे. या धरणाचा गाळ काढल्यास जवळपास ४६ गावे व ३३ आदिवासीवाड्यांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असून संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे धरणातील गाळ काढण्यासाठी तीन वेळा निविदा व सूचना प्रसिद्ध करूनही धरणाचा गाळ काढण्यास विलंब होत असल्यामुळे गावांना व आदिवासीवाड्यांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करून ४६ गावे व ३३ आदिवासीवाड्यांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी उमटे धरणातील गाळ काढण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, उमटे धरणातील गाळ काढण्यास विलंब होत असल्याची बाब खरी असून या कामासाठी तीन वेळा निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, त्यास प्रतिसाद प्राप्त झाला नाही. या कामाकरीता पुन्हा निविदा प्रक्रिया सुरू आहे. उमटे धरण हे उमटे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचा उद्भव आहे. (पान २ वर..)

## रेवस बंदरातून डिझेल तस्करी; १४ लाखांचा माल जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

मासेमारीच्या नावाखाली समुद्रात पेट्रोल आणि डिझेलची तस्करी करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यास रायगड पोलिसांनी सुरुवात केली आहे. डिझेलची तस्करी करणाऱ्या एका बोटीवर मांडवा पोलिसांनी कारवाई करीत तब्बल पाच हजार लिटर डिझेल साठ्यासह १४ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी डिझेलमाफिया राजू पंडित याचा साथीदार गणेश कोळी याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मागील सहा महिन्यांपासून जिल्ह्यातील मांडवा, रेवदंडा अशा वेगवेगळ्या बंदरात हा गोरखधंदा राजरोसपणे सुरू होता. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साळाव खाडीमध्ये डिझेलची तस्करी झाली होती, ज्या प्रकरणात गणेश कोळीसह राजू पंडित याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला होता, मात्र पुन्हा डिझेलमाफिया सक्रिय झाल्याचे चित्र समोर आले आहे. (पान २ वर..)



## खोपोलीत भाजप संपर्क कार्यालयांचे उद्घाटन

### जनतेचे प्रश्न सोडवा -आमदार प्रशांत ठाकूर

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील गगनगिरी नगर येथील भाजपचे अविनाश तावडे यांच्या; त्याचप्रमाणे साबळे नगर येथील विक्रम साबळे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ५) करण्यात आले. या वेळी बोलताना त्यांनी कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सोडवावे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहचवून त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे, असे सूचित केले.

या कार्यक्रमास माजी आमदार सुरेश लाड, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, संपर्क नेते सुनील घरत, जि.प.चे माजी आरोग्य सभापती नरेश पाटील, आत्करगावचे माजी सरपंच संदीप पाटील, खालापूर तालुकाध्यक्ष सनी यादव, विक्रम साबळे, अविनाश तावडे, खोपोली अध्यक्ष राहुल जाधव, अश्विनी अत्रे, विठ्ठल मोरे आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### फरार नीरव मोदीचा भाऊ नेहल मोदीला अटक

**न्यूयॉर्क** : हिरे व्यावसायिक नीरव मोदीचा लहान भाऊ निहल मोदीला अमेरिकेत अटक करण्यात आली आहे. सक्तवसुली संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सादर केलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीवरून ही कारवाई झाली. ४६ वर्षीय नेहल मोदीला शुक्रवारी ताब्यात घेण्यात आले. त्याच्यावर पंजाब नॅशनल बँकेत झालेल्या घोटाळ्यासंबंधी मनी लॉण्डरिंग, गुन्हेगारी कट रचणे आणि पुराव्यांशी छेडछाड केल्याचा आरोप आहे.

### सुशील केडियांना अखेर उपरती; मागितली माफी

**मुंबई** : मराठीवरून अवमानजनक व मुजोर वक्तव्य करणारे व्यावसायिक सुशील केडिया यांनी अखेर माफी मागितली आहे. मी माझ्या चुकीबद्दल माफी मागतो, असे म्हणत केडिया यांनी एक्सवर व्हिडीओ पोस्ट करत माफी मागितली आहे. मी केलेले ते ट्वीट चुकीच्या मानसिक अवस्थेत व तणावात लिहिले गेले होते, पण मी माझी चूक स्वीकारतो तसेच आता अपेक्षा करतो की, वातावरण शांत करावे, असेही केडिया यांनी म्हटले आहे.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी फाउंडेशन कोर्स

### उद्घाटन समारंभात मान्यवरांकडून मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना जेईई आणि नीट या स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी फाउंडेशन कोर्स सुरू करण्यात आला असून त्याचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ५) झाले.



या वेळी आयोजित सेमिनारची सुरुवात राज अलोनी यांनी पालकांच्या प्रमुख चिंता, जसे की, कोणता बोर्ड निवडायचा आणि कधी निवडायचा तसेच कोचिंग सेंटरमधील एकात्मिक वर्ग आणि शाळांमधील फरक यावर चर्चासत्राने झाली. त्यानंतर एकात्मिक अभ्यासात अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा कशी मदत करते हे स्पष्ट करत वरिष्ठ माध्यमिक समन्वयक इफत काटे यांनी जेईई आणि नीट परीक्षांबाबत सविस्तर मार्गदर्शन दिले. या वेळी विविध शैक्षणिक कार्यक्रम आणि स्पर्धात्मक प्लॅटफॉर्मद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची वृत्ती वाढवण्यासाठी शाळेने सुरू असलेल्या उपक्रमांवरही भर देण्यात आला.

या कार्यक्रमास संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संचालक अर्चना ठाकूर, सदस्य राहुल घरत, आयआयटीयन हबचे संस्थापक डॉ. सौरभ प्रियदर्शी, डॉ. रजनीश कुमार आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पालकांना त्यांच्या मुलांना शैक्षणिक उत्कृष्टतेच्या प्रवासात पाठिंबा देण्यास आणि मार्गदर्शन करण्यास प्रोत्साहित केले.




राष्ट्रीय स्वयंसेवक संघ... स्वातंत्र्यपूर्व काळात २७ सप्टेंबर १९२५ रोजी केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेली संघटना. रा. स्व. संघाला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या कालखंडात तावून-सुलाखून निघालेल्या या संघटनेने अनेक चढउतार पाहिले आहेत. संघाच्या या दीर्घ वाटचालीची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त लेखमाला सुरू करीत आहोत. गुरूपौर्णिमेला म्हणजे गुरूवार, १० जुलै २०२५ रोजी या लेखमालेतील पहिला लेख प्रसिद्ध होईल. त्यानंतर दर रविवारी पुढील लेख प्रकाशित केले जातील.

-मुख्य संपादक

# आम्ही फ्लॉवर की फायर हे पुढच्या निवडणुकीत दिसेल -एकनाथ शिंदे



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. या टिकेनंतर 'आम्ही फ्लॉवर की फायर आहोत हे पुढच्या निवडणुकीत दिसेल', असे प्रत्युत्तर शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले आहे.

राज्य सरकारने हिंदी भाषा सक्तीचा निर्णय रद्द केल्यानंतर आज शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्यावतीने जल्लोष साजरा करण्यासाठी मुंबईत विजयी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली.

या टिकेनंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर देत थेट सूचक इशाराच दिला आहे. 'आम्ही फ्लॉवर की फायर आहोत हे पुढच्या निवडणुकीत दिसेल', असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे तसेच तीन वर्षांपूर्वी फक्त अर्ध्याच दाढीवरून हात फिरवला होता तरी ते अद्याप सावरले नाहीत, असं म्हणत शिंदेंनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

खरं म्हणजे तीन वर्षांपूर्वी धो डाला अब उठेगा नहीं साला, हा डायलॉग उद्धव ठाकरे यांनाच शोभून दिसतो. मी तीन वर्षांपूर्वी अर्ध्याच दाढीवरून हात फिरवला होता तरी ते आडवे झाले आणि अजून सावरले नाहीत. आता उद्धव ठाकरे कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना अशा प्रकारचं बोलणं शोभत नाही. त्यासाठी मनगटात जोर लागतो, फक्त बोलून काही होत नाही, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. 'आता एवढंच सांगतो की मेळाव्यात एकाने मराठीबाबतची तळमळ बोलून दाखवली आणि दुसऱ्याने सत्तेसाठी आणि खुर्चीसाठी मळमळ बोलून दाखवली. झेंडा नाही, अजेंडा नाही असं काही लोक म्हणत होते.

मेळाव्यातील एका वक्ताने ते पाळलं, तर दुसऱ्याने स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा आजेंडा बोलून दाखवला. उद्धव ठाकरेंच्या भाषणात एक जळजळ आणि मळमळ होती हे दिसून आलं. मराठी माणूस मुंबईबाहेर का फेकला गेला? मुंबईतील मराठी माणसांचा टक्का का कमी होत गेला? याचं उत्तर त्यांनी दिलं पाहिजे, असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

एकाच्या भाषणात मराठीची तळमळ दिसली आणि दुसऱ्याच्या भाषणात सत्तेसाठी मळमळ होती ती दिसली. हा दोन्हीमधला फरक आहे. उद्धव ठाकरे माझ्यावर कायम टीका करतात, मात्र मी त्यांच्या टीकेला कामाने उत्तर देतो. कामामधून उत्तर दिलं म्हणून आम्हाला लोकांनी पुन्हा कौल दिला. मी २०२२ ला अर्ध्याच दाढीवरून हात फिरवला होता तेव्हा ते आडवे झाले, अद्याप सावरलेच नाहीत. आता ते कोणाचातरी हात धरून उठण्याचा प्रयत्न करत आहेत.

तीन वर्षांपूर्वी अर्ध्याच दाढीवरून हात फिरवला होता, जर पूर्ण दाढीवरून हात फिरवला असता तर काय झालं असतं? याचा विचार करावा, उद्धव ठाकरे काय म्हणाले की फ्लॉवर की फायर? हे त्यांना पुढच्या निवडणुकीत कळेल, असा इशारा एकनाथ शिंदे यांनी दिला.

# एसटी पास थेट शाळेत योजनेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## पाच लाख २१ हजार ३५४ विद्यार्थिनी घेतला लाभ

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येत आहेत. केवळ १५ दिवसात म्हणजे १६ जुन ते ३० जुनपर्यंत तब्बल पाच लाख २१ हजार ३५४ विद्यार्थी - विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला आहे, अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जुनपासून सुरू झाल्या. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून केवळ ३३.३३% रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. या अंतर्गत एक लाख ६१ हजार २०४ विद्यार्थ्यांना त्यांच्या, त्यांच्या शाळेत जाऊन एसटी कर्मचाऱ्यांनी पास वितरित केले. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जातात. या अंतर्गत तीन लाख ६० हजार १५० विद्यार्थिनींना त्यांच्या शाळेत जाऊन पास वितरित करण्यात आले.



### शालेय बस फेऱ्या रद्द करू नये

*जून पासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. लाखो विद्यार्थी एसटीच्या बसेसने शाळेला जातात. त्यांच्यासाठी हजारो शालेय फेऱ्या एसटीने सुरू केलेल्या आहेत. परंतु विविध कारणांनी काही फेऱ्या अचानक रद्द केल्या जातात, अशा तक्रारी शालेय विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून येत आहेत. विशेषतः आदिवासी पाडे आणि दुर्गम भागातील शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना एकच बस फेरी उपलब्ध असल्याने. ती रद्द झाल्यास त्यांची प्रचंड गैरसोय होते. त्यामुळे यापुढे प्रत्येक आगार प्रमुखांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शालेय फेरी कोणत्याही परिस्थितीत रद्द होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिलेल्या आहेत.*

यापुर्वी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापन कडून पास घेतले जात असत. आता विद्यार्थ्यांना पास साठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा - महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्या कडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येत आहेत.

या संदर्भात १६ जुन पासुन एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत हि विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले होते.

या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होत आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

# तळा तालुक्यातील धबधब्यांचे पर्यटकांना आकर्षण

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात धबधब्यांचे आकर्षण वाढत असल्याने शनिवार, रविवार धबधबे होतात फुल. गोवा-मुंबई हायवेपासून ११ किमी अंतरावर वावे हवेली धरण आहे या वावे हवेली धरण क्षेत्रातील धबधबे पर्यटकांसाठी एक पर्वणी आहे. या धबधब्या बरोबरच तसेच तळेगाव, गायमुख भागातही धबधब्यांवर पर्यटकांची वर्दळ दिसत आहे.



कुडालेणी, तळगड, तळा तालुका हा एक निसर्गाचा मोठा साठा आहे त्यात पावसाळा सुरु झाल्याने धबधबे वाहू लागले असून धरणे फुल झाली आहेत. आता एक मोठी पर्वणी पर्यटकांसाठी व कॉलेज युवकांसाठी असते दऱ्या खोरयातील या तालुक्यात अनेक ठिकाणी छोटे मोठे धबधबे व धरणावरील निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी कॉलेज कुमार ते पर्यटक मोठ्या संख्येने रविवारी मोठ्या प्रमाणात येतात व निसर्गाचा आनंद लुटून जातात.

वावे हवेली येथील धरणात पावसाळ्यात जास्त होणारा पाणी (ओव्हरफ्लो) काढण्यासाठीचा जो भाग आहे त्या पाण्याच्या स्रोतावरती पर्यटक व तरुण मौजमजा करत पोहत उड्या मारत मनमुराद आनंद लुटत असतात. धबधब्यांमध्ये एक कुंबेटचा धबधबा आहे. या धबधब्यावर मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होताना पहावयास मिळत आहे. यामुळे येथील नागरिकांना येणारे पर्यटक जेवणाची ऑर्डर देत असतात तर काही तळा शहरातून जेवण व इतर खाद्यपदार्थ नेत असतात त्यामुळे येथील नागरिकांना थोडं का होईना परंतु हाताला काही दिवस काम मिळत असते.

याचप्रमाणे आता तळा तालुक्यातील तळेगावचा धबधबा व बोरीच्यामाळचा धबधबा नावारुपाला येत असून मालाठेवाडी, मालुक याभागातही पर्यटनाला चालना देणारे धबधबे असून या धबधब्यावरती एक ते दिड कि. मी. च्या अंतराएवढे चालत जावे लागते या ठिकाणी तळीराम मात्र न चुकता धबधब्यांवरती रविवारी मजा लुटण्यासाठी जाताना पहावयास मिळतात तळेगाव जवळील धोदानी धबधबा आता प्रसिध्दीस येत आहे या येथे मोठ्या प्रमाणात निसर्गप्रेमी येत असून हे ठिकाण त्यांच्यासाठी एक पर्वणीचआहे निसर्गाच्या नयनरम्य अशा झाडीवेलींतून डोंगरावरुन कोसळणाऱ्या धोदानी धबधब्यावर निसर्गाच्या सानिध्यात वर्षासहलीचा आनंद लुटण्यासाठी येथे दुरवरुन पर्यटक येत असतात.

# राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष मोहिमेला रायगडात सुरुवात

**रायगड : रामप्रहर वृत्त**

न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांमध्ये संवाद व सामंजस्याच्या माध्यमातून तडजोड साधण्यासाठी राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मोहिम रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार ही मोहिम १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्हा न्यायालय रायगड व सर्व तालुका न्यायालयांमध्ये राबविली जात आहे.

या मोहिमेंतर्गत कौटुंबिक वाद, मोटार अपघात नुकसानभरपाई, धनादेश न भरल्याच्या (चेक बाऊन्स) तक्रारी, वाटप दावे, वाणिज्यिक दावे तसेच इतर सर्व तडजोडयोग्य दिवाणी व फौजदारी प्रकरणे सामंजस्याच्या माध्यमातून निकालात काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

मध्यस्थी ही न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा जलद, खर्चिकदृष्ट्या कमी व गोपनीयता जपणारी पद्धत असून, यात कोणत्याही पक्षावर निर्णय लादला जात नाही. न्यायालयात प्रलंबित असलेल्या व तडजोडीयोग्य असलेल्या प्रकरणांमध्ये दोन्ही पक्ष आपसात थेट संवाद साधून सुसंवादातून आपली समस्या सोडवू शकतात.

या मोहिमेचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र सावंत यांनी पक्षकारांना त्याचा फायदा घ्यावा असे अवाहन केले आहे.

पान १ वरून

## उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करा -आमदार प्रशांत ठाकूर

उमटे धरणातील गाळ काढल्यानंतर या धरणाची पाणी साठवण क्षमता वाढणार आहे. त्यामुळे योजनेतील समाविष्ट गावे, वाड्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या कामाची निविदा तीन वेळा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यास प्रतिसाद प्राप्त झाला नाही. पुन्हा चौथ्यांदा निविदा प्रसिद्ध करून निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू आहे तसेच उमटे धरणातून या गावांना व वाड्यांना पाण्याचा पुरवठा सुरू आहे, अशीही माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

## रेवस बंदरातून डिझेल तस्करी; १४ लाखांचा माल जप्त

रेवस बंदरावर एका बोटीतून डिझेलची तस्करी होत असल्याची माहिती मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक दीपक भोई यांना मिळाली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पाच ते सहा बोटींची तपासणी केली. त्यामध्ये श्री समर्थ कृपा बोटीत हजारो लिटर डिझेलचा साठा आढळला. पोलिसांनी हा डिझेल साठा जप्त करून तस्करी करणाऱ्याविरोधात कारवाई केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## खोपोलीत भाजप संपर्क कार्यालयांचे उद्घाटन

आगामी काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून विविध पक्षांचे कार्यकर्ते भाजपमध्ये येऊ शकतात. त्यांना सोबत घेऊन पक्ष संघटना वाढीसाठी सर्वांनी एकदिलाने काम करावे. आगामी सर्व निवडणुकांमध्ये भाजप एक नंबरचा पक्ष राहणार आहे, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला. त्यांनी साबळे कुटुंबियांच्या तीन पिढ्यांनी सामाजिक योगदान दिल्याचेही सांगितले.

माजी आमदार सुरेश लाड यांनी म्हटले की, पक्ष संघटना वाढत आहे. इतर पक्षांतून मोठ्या प्रमाणात पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये येऊ इच्छितात. त्या सर्वांचे आपण स्वागत करू. हे करीत असताना निष्ठावंतांवर अन्याय होणार नाही याची पक्षश्रेष्ठी दखल घेतील.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, मागील खोपोली नगरपालिका निवडणुकीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वेळ देऊन प्रयत्न केले. त्या वेळेस संघटनात्मक ताकद कमी असल्याने अपयश आले असले तरी या वेळी समीकरणे वेगळी आहे. मागील काळात सुरेश लाड इतर पक्षात होते, परंतु ते आता आपल्या पक्षात असल्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीचा व अनुभवाचा फायदा घेऊन आपण सर्व निवडणुकांमध्ये चांगले यश प्राप्त करू, असा विश्वास व्यक्त केला.

प्रास्ताविकात खोपोली मंडळ अध्यक्ष राहुल जाधव यांनी पक्षाच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश मरागजे यांनी केले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी यशवंत साबळे यांच्या काशी स्पोर्ट क्लबला भेट देऊन तेथील कार्याची ओळख करून घेतली.

# दुर्गम भागातील स्टेशन ठाकूरवाडी सौर दिव्यांनी उजळली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतहून पुण्याला जाताना खंडाळा घाटातील स्टेशन ठाकूरवाडी मध्ये चिराग फाउंडेशनच्या पुढाकाराने मिंटोक प्रायव्हेट लिमिटेड आणि धवल शहा यांच्या माध्यमातून शाळा व सार्वजनिक ठिकाणी तसेच ग्रामस्थांच्या घरात सौर दिवे लावले जात आहेत. या उपक्रमामुळे हे कर्जत तालुक्याच्या दुर्गम ठिकाणी असलेले गाव सौर दिव्यांनी उजळून निघत आहे.




या वाडीतील शाळेमध्ये दिलेले सोलर पॅनल, एलईडी, क्रीडा साहित्य व लायब्ररीचे उदघाट्न दिमाखात पार पडले. मिंटोक कंपनीने दिलेल्या या सर्व वस्तूंचे औपचारिक उदघाट्न आणि कोनशीला अनावरण मिंटोकचे संस्थापक रमा ताडेपल्ली, खुशाल तलरेजा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी चिराग फाउंडेशनच्या संचालक प्रतिभा पै, ऑपरेशन हेड रुपाली पालवणकर, कामयुनिकेशन मॅनेजर तृप्ती भोसले, फिल्ड सुपरवाझर निखिल सिंह बागल, केंद्र प्रमुख उज्वला मोरे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी मिंटोक कंपनीच्यावतीने शाळेला सोलर पॅनल आणि ४५ घरांना सौर दिवे, बीएलआर लॉजिस्टिकच्या वतीने १५ घरांना सौर दिवे व वॉटर फिल्टर, धवल यांनी ३१ सौर दिवे व ७६ वॉटर फिल्टर आणि सहा पथ दिवे वाटप केले. असे एकूण ९८ सौर दिवे आणि वॉटर फिल्टरचे वाटप करण्यात आले.

बीडचे माजी सरपंच किसन कवटे यांनी आभार मानताना, ' आमच्या वाडीत पावसाळ्यात पंधरा - पंधरा दिवस अंधार असायचा. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असे. तसेच विंचू, साप, हिंस्र प्राणी यांची भीती वाटायची. यात काही लोकांचा मृत्यूदेखील झाला आहे.

चिराग फाउंडेशनच्या पुढाकाराने आता घरोघरी सौर दिवे आणि चौकात सौर पथ दिवे लावल्याने वाडी उजळून निघाली आहे. या वेळी शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्याभवनमध्ये उद्‍बोधनपर दिंडीतून सामाजिक संदेश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शनिवार ५ जुलै २०२५ रोजी विद्याभवन शाळेत आषाढी एकादशी निमित्त उद्बोधनपर दिंडीचे आयोजन करण्यात आले. या वेळी गोविंद कांबळे राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक (प्रशासन) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद , मुंबई, तसेच संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते विठुरायाच्या पालखीचे पूजन करण्यात आले.

या वेळी गोविंद कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना एक पेड माँ के नाम या उपक्रमाचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार व्हावा तसेच आपल्या आई बद्दल व धरती माते बद्दलचे प्रेम व्यक्त करणारा हा उपक्रम यशस्वी करण्याकरता सर्वांनी प्रयत्न करावे. ७५ हजार झाडे लावण्याच्या या उपक्रमात सर्वांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या वेळी इको क्लब फॉर मिशन लाईफ उपक्रमांतर्गत गोविंद कांबळे व त्यांची कन्या प्रांजल कांबळे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वृक्षारोपण करून एक पेड़ माँ के नाम या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

या काढण्यात आलेल्या दिंडीत आरोग्याच्या व स्वच्छतेच्या घोषणा देत दिंडीची वारी शालेय परिसरात फिरली. जवळच्या विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले




# जनसामांन्यासाठी महायुती सरकार अधिक गतिमान -मंत्री आदिती तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी हे अभियान या आधी राबविण्यात आले आहे. आता त्याच्यापुढे जाऊन छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान राबविण्यात येत आहे. आभियानची माहीती नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी लोकप्रतिनिधीनी सुध्दा पुढाकार घेतले पाहिजे. १५ ऑगस्टच्या ग्रामसेभत यांची माहीती दिल्यास नागरीकांना त्याचा लाभ होईल. शासनाच्या विविध योजना नागरीकांपर्यंत पोहचवायचे आहे. या अभियानाच्या अंतर्गत लोकांपर्यंत योजना पोहचविण्याचे काम चालु आहे.जनसामान्यासाठी हे सरकार अधिक गतीमान असल्याचे महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान रोहा शहरातील जेष्ठ नागरीक सभागृह येथे आयोजित करण्यात आले



होते. यावेळी आदिती तटकरे बोलत होत्या.यावेळी जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपविभागीय अधिकारी रोहा ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, विजयराव मोरे, विनोद पाशीलकर, अमित घाग, समिर शेडगे, महेंद्र गुजर, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, नायब तहसीलदार राजेश थोरे, मोकल, गव्हाणकर, उज्वला अंधारे, अमित उकडे, रवी चाळके, शैलैश रावकर आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरात कृषी विभाग, आरोग्य विभाग, महसुली विभाग, आपत्ती व्यवस्थापन, महावितरण, भुमी अभिलेख, नगरपरिषद, पंचायत समिती आदी शासनाच्या विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यांनी आपल्या विभागाची माहिती या वेळी दिली.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने शासनाचे सर्व विभागाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, रोहेकर नागरिक उपस्थित होते.

## निवडक

### कंटेनरमधून ऐवजाची चोरी

**पनवेल :** कंटेनरचे लॉक तोडून अनोळखी व्यक्तीने सव्वा लाख रुपयांच्या ऐवजाची चोरी केली. या वेळी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत. राकेश पाटील हे दोन जुलै रोजी कामावर आले. त्यावेळी साइटवर काम करणाऱ्या वर्करने फोन करून अज्ञात व्यक्तीने ओवळे फाटा साईड वरील कंटेनरचे लॉक तोडल्याचे सांगितले. त्यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता सात बॅटरी, दीडशे लिटर डिझेल, इलेक्ट्रिक केबल, कटर ग्राइंडर, हॅलोजन, टूल बॉक्स ई. असा एक लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी ३ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

### ट्रेलरच्या धडकेने एकाचा मृत्यू

**पनवेल :** ट्रेलरच्या धडकेने एका मोटार सायकलस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील जुना मुंबई-पुणे हायवेवर एस.व्ही.मोटार्स पळस्पे समोरील रस्त्यावर घडली आहे. मोटरसायकलस्वार राहूल ढेपे (३८ रा.वडाळा) हा त्याची मोटरसायकल घेवून आपल्या गावी माणगाव या ठिकाणी जात असताना पनवेल जवळील जुना मुंबई-पुणे हायवेवर एस.व्ही.मोटार्स पळस्पे येथे त्याच्या गाडीला ट्रेलरची धडक बसल्याने झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ज्वलनशील पदार्थांच्या लिलाव

**पनवेल :** डिझेलजन्य ज्वलनशील पिवळसर द्रव्य पदार्थाचा मुद्देमाल जप्त केला असून त्याचा लिलाव तळोजा पोलीस ठाण्याच्या माध्यमातून ७/७/२०२५ रोजी करण्यात येणार आहे. ७०० लिटर डिझेल जन्य ज्वलनशिल पिवळसर द्रव्य पदार्थ असा मुद्देमाल तळोजा पोलिसांनी जप्त केला आहे. सदर मुद्देमालाचा जाहीर लिलाव दि.७/७/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता तळोजा पोलीस ठाण्याच्या आवारात करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुकांनी तत्पूर्वी तळोजा पोलीस ठाण्याचे (०२२-२७४१२३३३), (९८२२७६१०९०, ९८२१२२६८१२, ९८७०३०१०९०) यावर संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि प्रवीण भगत यांनी केले आहे.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील विश्राळी नाका जी.एम.वाईन्स शॉप येथे उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. हर्षद दळवी यांनी त्यांची २५ हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची डिओ मोटरसायकल (एमएच-०१-सीएक्स-७६५९) राखाडी रंगाची ही सदर ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कामोठे येथून मायलेक बेपत्ता

**पनवेल :** कामोठे गाव सेक्टर १४ येथे राहणारी जमुनाबाई गुरुनाथ राठोड (वय ३५) ही महिला आपल्या तुषार



गुरुनाथ राठोड (वय ८) या मुलासह घरातुन कोणास काही एक न सांगता निघुन गेली आहे. ती अद्याप परत न आल्याने ती हरवल्याची तक्रार तिचे पती गुरुनाथ रामचंद्र राठोड यांनी कामोठे पोलीस ठाण्यात दिली आहे. महिला कुणाला कोठे आढळल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे (८६५५३५४११४) येथे किंवा पो. हवालदार माने यांच्याशी (९८७०२२६२०५) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### 'ईट प्ले रीड'कडून ताकवाटप





**पनवेल :** ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली ईट प्ले रीडच्या रजदूतांकडून पनवेल, नवी मुंबई विभागामध्ये ताक वाटप करण्यात आले. ईट प्ले रीडकडून नेहमीच सामाजिक, शैक्षणिक उपक्रम पनवेल-नवी मुंबई मध्ये राबवले जातात. या संस्थेचा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र आहे. संस्थेच्या वतीने पनवेल-नवी मुंबई मध्ये ताक वाटप करण्यात आले, जेणेकरुण नागरिकांना त्यातून एनर्जी मिळावी शरीराला आतून थंडावा मिळावा. या वेळी अनेक नागरिक उपस्थित होते.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शरद ढोमे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी अमित जाधव आणि संजय कोळी उपस्थित होते.**

# विठ्ठलनामाची शाळा भरली! आषाढीनिमित्त कार्यक्रम

## 'सीकेटी'मध्ये विठूनामाचा गजर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक सस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि.५) आषाढी एकादशी-पालखी सोहळा, वृक्षदिंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत पारंपारिक पद्धतीने काढलेल्या वृक्षदिंडीमुळे शाळेला जणू पंढरीचे स्वरूप आल्यासारखे भासत होते. विद्यार्थ्यांनी केलेल्या विठ्ठल-रखुमाईच्या वेशभूषेने हा सोहळा अधिक रंगला, विठ्ठल नामाच्या गजराने सोहळा बहरला, वृक्षारोपण कार्यक्रमातून विद्यार्थ्यांस वृक्षसंवर्धनाचे महत्व समजले विद्यालयाचे प्राचार्य कैलास सत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षदिंडी,



पालखी सोहळा, वृक्षारोपण, अभंग, गजर अश्या कार्यक्रमाचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.

आषाढी एकादशी वृक्षदिंडी पालखी सोहळ्यास विद्यालयाचे प्राचार्य कैलास सत्रे, विद्यालयाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, तसेच उच्च माध्यमिक विद्यालयचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंगजी माध्यम-माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यम-प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे तसेच इंगजी माध्यम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंगजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी कार्यक्रमास उपस्थित होते.

## एमएनएम विद्यालयात दिंडी सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेजमध्ये शनिवारी (दि.५) आषाढी एकादशीनिमित्त भव्य दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी डोक्यावर तुळस, कपाळाला टिळा, गंध लावून तसेच विठ्ठल रखुमाई, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या पारंपारिक वेशभूषा करून दिंडी उत्सवात सहभागी झाले. शाळेच्या परिसरापासून कोपर येथील हनुमान मंदिरापर्यंत निघालेल्या या दिंडीमुले विठ्ठल नामाच्या जयघोषाने सारा परिसर दुमदुमून गेला होता. विद्यार्थ्यांनी पर्यावरण, पाणी, स्वच्छता याचे संदेश देणारे विविध फलक हातात घेत घोषणा दिल्या. टाळ मृदुंगाच्या गजरात शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी दिंडीची विधीवत पूजा केली.

दरम्यान, यानिमित्त आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी वादविवाद




स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच या वेळी सार्थक पवार, स्वरा देशमुख, साक्षी पोटे, श्रावणी गवळी या विद्यार्थ्यांनी विठ्ठलाची सुमधुर भजन आणि भक्ती गीते साजरी केली.

# विठ्ठलाच्या गजरात दुमदुमले विद्यालयाचे प्रांगण

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनि. कॉलेजमध्ये शनिवारी (दि.५) आषाढी एकादशीनिमित्त विविध कार्यक्रम सादर केले गेले.

महाराष्ट्राला संतपरंपरेचा मोठा इतिहास लाभलेला आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, असंही म्हटलं जातं त्यातीलच सर्व महाराष्ट्रातल्या लोकांचं आराध्य दैवत म्हणजे विठ्ठल रुक्मिणीविठ्ठल दर्शनाच्या ओढीने सर्व वारकरी दिंडीच्या माध्यमातून पंढरपूरला पोहचतात आणि विठ्ठल नामाच्या गजरात रंगून जातात. हा सांस्कृतिक वारसा विद्यार्थ्यांपर्यंतही पोहचावा या हेतूने लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, कामोठे विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यालयात विद्यार्थ्यांना



वारीचे प्रदर्शन तसेच टाळ मृदुंग याचबरोबर विठ्ठल भक्तीचा संगीताने एक अनोखा अनुभव दिला.

ग्रंथदिंडी काढण्यात आली. ग्रंथदिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी. या हेतूने ग्रंथदिंडीचे आयोजन केले गेले. या ग्रंथ दिंडीचे आयोजन स्वप्नाली म्हात्रे यांच्याच मार्गदर्शनाखाली झाले. त्यानंतर विद्यालयाच्या संगीत विभागाने विठ्ठलाचा ठेका धरायला लावणारे एक सुंदर असे गीतही सादर केले. यासाठी विद्यार्थ्यांनी उत्तम असा सराव केलेला होता. विद्यार्थी वारकऱ्यांच्या पोशाखामध्ये आलेले होते तर विद्यार्थिनींनी नऊवारी साडी व महाराष्ट्रीयन परंपरा जपत तसाच पोशाख अर्थात वेशभूषेमध्ये उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी आपला सांस्कृतिक वारसा जपावा असे प्रतिपादन विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी केले. वारी हे मानवतेचे आणि माणुसकीचे एक जिवंत उदाहरण आहे. अशीच मानवता आणि माणुसकी विद्यार्थ्यांनीही आपल्या जीवनामध्ये आणावी असाही मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. विविध कार्यक्रमाने आणि भक्तीरसाने मांडलेल्या या कार्यक्रमात संपूर्ण विद्यालय सहभागी झाले होते. पर्यावरण पूरक फलकही या दिंडी मध्ये विद्यार्थ्यांनी दाखवले.

विद्यालयाच्या प्रांगणामध्ये टाळांचा आवाज आणि त्याचा नाद दूम दूमला आणि जय जय विठ्ठल जय हरी विठ्ठल या जयघोशात विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व जाणून घेतले. त्या पाठीमागचा वैज्ञानिक दृष्टिकोनही समजून घेतला. अतिशय उत्साहात आणि आनंदात हा आषाढी एकादशीचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजुडकर, नेहाखन्ना व मिनल नाईक तसेच विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदी उत्साहाने सहभागी झाले व विठ्ठलाच्या भक्तीमध्ये रंगून गेले.

## फडके विद्यालयात आषाढी एकादशी कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील म. ए. सो. संस्थेच्या आ.वा.ब.फडके विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागातर्फे शनिवारी (दि.५) आषाढी एकादशी मोठ्या श्रद्धा, भक्तीभाव आणि आनंदमय वातावरणात साजरी करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाखात टाळ-मृदुंगाच्या गजरात आळंदी ते पंढरपूर वारीचे प्रत्यक्ष दर्शन घडवणारी दिंडी मिरवणूक सादर केली. हातात भगवे झेंडे, मुखी ज्ञानोबा-तुकारामचा गजर यामुळे विद्यालयाचा संपूर्ण परिसर भक्तीमय झाला.

कार्यक्रमात पावली (टाळ) सादर करत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष वारीचे दर्शन घडवले. यानंतर विद्यार्थ्यांनी विठ्ठलाच्या गाण्यांवर अद्वितीय नृत्य सादरीकरण आणि विविध विठ्ठलगीतांचे सुमधुर मॅशअप सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विशेष म्हणजे, या उत्सवात विद्यार्थ्यांचे आजोबा-आजी तसेच पालक प्रतिनिधीदेखील उपस्थित होते.

पालकांनी आवर्जून सांगितले की, शाळा मुलांमध्ये भारतीय संस्कृती, भक्तीभाव आणि नैतिक मूल्ये रुजवण्याचे अतिशय स्तुत्य कार्य करत आहे. फडके विद्यालयातील सर्व उपक्रम विद्यार्थ्यांना केवळ सुजाण नागरिकच नव्हे तर सांस्कृतिक संस्कारही रुजवतात, हे पुनश्च सिद्ध झाले. प्रसाद वाटपानंतर विठ्ठल नामाच्या जयघोषात कार्यक्रमाची सांगता झाली.

## दि.बा. पाटील विद्यालयात प्रबोधन दिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाच्या आषाढी एकादशी निमित्त रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि. बा.पाटील विद्यालय कामोठे येथे वारकरी दिंडी, पर्यावरण, बेटी बचाव अशा सामाजिक विषयावर प्रबोधनपर दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्राची परंपरेचे विविध गुणदर्शन लेझीम पथक, पारंपारिक वेशभूषा, संत वेशभूषा या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांनी दाखविले. महाराष्ट्राच्या संतांचा वैचारिक वारसा जपण्याच्या उद्देशाने वारीचे आयोजन करण्यात आले होते.

या दिंडीतील पालखी सोहळ्याचे पूजन विद्यालयाचे सल्लागार समिती चेअरमन तथा स्कूल कमिटी सदस्य जयदास गोवारी, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, माजी चेअरमन



बाळाराम चिपळेकर,माजी चेअरमन व शिक्षण प्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगरे सर यांच्या हस्ते करण्यात आले.

आषाढी एकादशी निमित्ताने काढलेली प्रबोधनपर विद्यार्थी वारकरी पायी दिंडी आनंदात व उत्साहात साजरी केल्याबद्दल सर्व शिक्षकांचे, सहभागी विद्यार्थ्यांचे, सर्व स्थानिक सल्लागार समितीचे तसेच ठझ्ज च्या विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे वाहंतुक नियंत्रणाचे काम केले व दिंडी यात्रेसाठी कामोठे पोलीस स्टेशन यांनी सहकार्य केल्याबद्दल आणि जयदास गोवारी साहेबांनी सर्व विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप केले.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मास्टरमाईंड स्पर्धेत यश

## मान्यवरांकडून अभिनंदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मास्टरमाईंड स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सरकार समारंभ शनिवारी (दि.५) आयोजित करण्यात आला होता. या वेळी संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, येथे मास्टर माइंड्स स्पर्धा २०२४-२५चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला, ज्यात विद्यार्थ्यांनी आपले उत्कृष्ट कौशल्य प्रदर्शन केले. या स्पर्धेत इंग्रजी, विज्ञान, गणित, भूगोल आणि सामान्य ज्ञान यांसारख्या विविध विषयांमध्ये शालेयस्तरावर तब्बल ९०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यापैकी सर्वच्या सर्व ९०० विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र




ठरले आणि त्यांनी ए प्लस आणि ए श्रेणी मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. राज्यस्तरीय मास्टरमाइंड्स स्पर्धेत २१३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला, ज्यापैकी अनेकांनी ए प्लस आणि ए श्रेणी प्राप्त केली. विशेष म्हणजे, ४५ विद्यार्थ्यांनी रँक होल्डर बनण्याचा मान मिळवला आणि त्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले. याही पुढे जाऊन, ११८ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व केले, आणि त्यापैकी २२ विद्यार्थी रँक धारक ठरले.

राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सानवी संदीप सौकुर, स्वरा तेजस पोथी, अरिशा मन्सूरी, अभिराज शिलीमकरआणि गरवी तिडके या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सदस्य राहुल घरत आणि प्राचार्य राज अलोनी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी विजेत्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला.

## खिडूकपाडा येथे वह्या आणि छत्रीवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना शिक्षकवण्याची जबाबदारी जितकी शिक्षकांची आहे तितकीच जबाबदारी पालकांचीदेखील आहे त्यांनीदेखील आपल्या पाल्याच्या शिक्षणाकडे लक्ष देऊन त्याच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतला पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी खिडूकपाडा येथे भाजपचे युवा नेते निलेश भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजीत केलेया वह्या आणि छत्री वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.

भारतीय जनता पक्षाचे युवा नेते निलेश भोईर यांचा वाढदिवस शनिवारी शैक्षणिक उपक्रमराबवून साजरा झाला. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून वह्यांचे वाटप खिडूकपाडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत करण्यात आले. तसेच निलेश भोईर यांच्या माध्यामतून छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजप नेते तथा वाहतुक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष प्रभुदास भोईर, भाजप नेते शशिकांत शेळके, सुरेश भोईर, प्रभाकर हरी उलवेकर, देवसास भोई, शंकुनाथ बोईर, अमर उलवेलकर, मिन्नथ भोईर, अंकुश भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

या वेळी अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन निलेश भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



# आणीबाणी @५० वर्ष

**सामना, आंधी, किस्सा कुर्सी का इत्यादी चित्रपटांवर बंदी आली...**

चित्रपट व चित्रपटसृष्टी यावर म्हणजेच पडद्यावर येत असलेली बरी वाईट (चांगली वा सामान्य वगैरे) कलाकृती आणि पडद्यामागच्या अगणित व अनेक प्रकारच्या घडामोडींवर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, माध्यम, क्रीडा क्षेत्राचा बरा वाईट परिणाम होत असतोच. त्या दृष्टीकोनातूनही चित्रपटसृष्टीवर फोकस टाकायला हवा. आणि अशीच एक अतिशय महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे, आपल्या देशातील आणीबाणी पर्व. आपल्या देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू झाली. आणि ती एकोणीस महिने होती. या गोष्टीलाही पन्नास वर्ष पूर्ण झाली आहेत. विविध माध्यमांतून त्यावर फोकस टाकला जातोय.

याच आणीबाणीत काही चित्रपटांच्या प्रदर्शनावर बंदी आली आणि त्याची आजही चर्चा होत असते.

मराठी चित्रपटाबाबत सांगायचे तर, रामदास फुटाणे निर्मित व डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित सामना या चित्रपटावरील आणीबाणीतील बंदी फारच वादग्रस्त ठरली. पुणे शहरात सामना चित्रपट १० जानेवारी १९७५ रोजी प्रदर्शित झाला तर मुंबईत हा चित्रपट १४ फेब्रुवारी १९७५ रोजी प्रदर्शित झाला. त्या काळात चित्रपटाच्या प्रिन्ट असत आणि टप्प्याटप्प्याने सर्वच भाषेतील चित्रपट प्रदर्शित होत असत. अशातच देशात आणीबाणी लागू होताच या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी आली. सामना चित्रपटास पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त पुणे शहरात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात आयोजित केलेल्या विशेष सोहळ्यात आणीबाणीत या चित्रपटावर आलेल्या बंदीचा विषय निघालाच.

पन्नास वर्षांपूर्वीच्या ग्रामीण भागातील राजकारणावर विजय तेंडुलकर यांच्या सशक्त प्रभावी लेखणीतून साकारलेले टोकदार भाष्य.. डॉ. श्रीराम लागू आणि निळू फुले यांच्या जबरदस्त अभिनयाचा 'सामना'.. असे कायमच कौतुकाने म्हटले जाते.

विजय तेंडुलकर यांची लेखक म्हणून केलेली निवड यामध्येच चित्रपटाचे यश निश्चित होते, असे रामदास फुटाणे नेहमीच सांगतात. 'सोंगाड्या' (१९७१), एकटा जीव सदाशिव ( १९७२) या चित्रपटांच्या वेळी दादा कोंडके यांच्याकडे प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून केलेल्या कामाचा निर्माता म्हणून फायदा झाला. त्या वेळी अवघ्या दीड लाख रुपयांत चित्रपट झाला, पण तेही जमा करताना कष्ट पडले.

रामदास फुटाणे 'सामना' निर्मितीच्या आठवणीत रमतात.

'विजय तेंडुलकर यांना पहिल्यांदा भेटलो तेव्हा, एखादा चित्रपट लिहून द्या अशी मागणी त्यांच्याकडं केली. सहा महिने त्याचा पाठपुरावा करत होतो. ते तयार झाले तेव्हा त्यांनी एक आग्रह धरला. निळू फुले आणि डॉ. श्रीराम लागू हे दोन अभिनेते चित्रपटात असायला हवेत. मी तो मान्य केला. त्या दोघांनाच केंद्रस्थानी ठेवून तेंडुलकर यांनी 'सामना' लिहिला. चित्रपटाचे शुटिंग सुरु झाले, तेव्हा निळू फुलेंना डॉ. लागू बारकाईने न्याहाळत होते. त्यांनी उभे केलेल्या पात्रापेक्षा वेगळे काहीतरी करायला हवे, असा डॉ. लागूंचा विचार होता. झालेही तसेच.. दोन्ही कलावंतांनी परस्पर भिन्न पात्रे साकारुन चित्रपटाच्या संहितेला न्याय दिला. तेव्हा अभिनेते म्हणून ही दोन्ही माणसे विलक्षण होती. याची प्रचिती आली.

'सामना' पुणे आणि मुंबईतील काही भाग वगळता अक्षरश: फ्लॉप झाला. समिक्षकांचा चांगला प्रतिसाद होता. तरी चित्रपट रसिकांना फारसा आवडला नव्हता. पडद्यावर चित्रपट सुरु असतानाच प्रेक्षक झोपतात, अशा प्रतिक्रिया दुर्दैवाने आम्हाला येत होत्या, असे रामदास फुटाणे सांगतात तेव्हा फारच आश्चर्य वाटते.

सामना चित्रपटगृहात अपयशी ठरुनही तो बर्लिनच्या चित्रपट महोत्सवात निवडला गेल्याची बातमी आली. लागलीच डॉ. लागूंचे घर गाठले आणि निधीसाठी त्यांना मंत्रालयात येण्याची विनंती केली. कोणासमोर कधीही हात न पसरलेल्या डॉ. लागूंनी त्या दिवशी सांस्कृतिक मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याशी चर्चा करून निधीची व्यवस्था केली आणि आमचा परदेश दौरा निश्चित झाला,' अशी आठवणीही फुटाणे यांनी सांगितली.

तेंडुलकरांनी या सिनेमाचं नाव 'सावलीला भिऊ नकोस' असं दिलं होतं. मात्र, हे नाटकाचं शीर्षक वाटत होतं. आणि ते खरेही होते. अनेकांना ते पटलं नव्हतं. तेंडुलकरांना मग आम्ही ते बदलण्याची विनंती केली. नंतर आठ-दहा दिवसांनी त्यांनीच 'सामना' हे शीर्षक ठेवलं.

मुंबईत सामना प्रदर्शित करताना वृत्तपत्राच्या जाहिरातीत म्हटले होते, सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवालसारखी प्रक्षोभक नाटके देणाऱ्या विजय तेंडुलकरांच्या लेखणीचा नवा मराठी चित्रावतार.

आणीबाणी उठल्यावर देशातील लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाचे सरकार आले. आणि सामना, आंधी इत्यादी चित्रपटांचा प्रदर्शनाचा मार्ग मोकळा झाला. सामनाचे मूळ वितरक टेम्पल मुव्हीज प्रकाशनकडून सामनाचे हक्क रामदास फुटाणे यांजकडे आले. त्यांनी तोपर्यंत सर्वाचे देणे फेडले होते. बर्लिन महोत्सवानंतर हा चित्रपट एकदम चर्चेत आला आणि यशस्वी झाला. आता 'सामना' चित्रपट हा रामदास फुटाणे यांनी ८ एप्रिल १९७७ रोजी मुंबईत प्लाझा चित्रपटगृहात रोज चार खेळ असा सामना पुन्हा प्रदर्शित करताच आठवड्यातील सर्वच्या सर्व अठ्ठावीस खेळ हाऊसफुल्ल ठरले. उत्साह वाढवणारी गोष्ट. हे यश आजही कायम आहे.

'मारुती कांबळेचं काय झालं' या रोखठोक संवादासह सरपंच आणि मास्तर यांच्यातील संभाषणाची जुगलबंदी ही या माईलस्टोन चित्रपटाची वैशिष्ट्य.

सत्तरच्या दशकात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सहकारी साखर कारखानदारी आणि त्यातूनच निर्माण होत असलेले महत्वाकांक्षी स्थानिक नेतृत्व असा सामाजिक राजकीय बदल होत होता. तोपर्यंत मराठी चित्रपटात गावातील 'पाटील ' दिसे. 'सामना'ने त्यात बदल घडवून आणला. त्याची गरज होतीच. सहकार सम्राट धोंडे पाटील यांच्या भूमिकेत निळू फुले आणि गांधीवादी मास्तरांच्या भूमिकेत डॉ. श्रीराम लागू असा हा अभिनयाचा कसदार 'सामना' रंगला. अभिनयासाठी हा आदर्श चित्रपट आहे. कधीही पहावा.

सामनाच्या फर्स्ट रनच्या नुकसानीतून सर्वाचे देणे फिटल्यानंतर दोन वर्षांनी चित्रपटाचे हक्क रामदास फुटाणेंकडे आले. आता 'सामना' चित्रपट हा माझ्यासाठी निवृत्तिवेतन म्हणजे पेन्शनची रक्कम देणारा ठरला असल्याचे रामदास फुटाणे नेहमीच सांगतात.











फिल्म कुंज या निर्मिती संस्थेचे जे. ओम प्रकाश निर्मित आणि गुलजार दिग्दर्शित 'आंधी ' (रिलीज १३ फेब्रुवारी १९७५ मुंबईत मेट्रो व १४ फेब्रुवारी १९७५ मुंबई उपनगर)

महत्वाकांक्षी राजकीय नेत्या आरतीदेवी (सुचित्रा सेन) आणि त्यांचे पती जे.के. (संजीवकुमार) यांच्या नातेसंबंधाची ही गोष्ट राजकीय चित्रपट म्हणून चर्चेत राहिली. या चित्रपटात संजीवकुमार आणि सुचित्रा सेन यांच्यासह ओम शिवपुरी, मनमोहन, कमलदीप, ए.के. हनगल, हरीश, रणवीर, सी.एस. दुबे इत्यादींच्या भूमिका आहेत.

लेखक कमलेश्वर यांच्याकडे राजकीय नेत्या तारकेश्वरी सिन्हा यांच्या आयुष्यावर आधारित एक गोष्ट होती. गुलजार यांना ती आवडताच त्यांनी व भूषण वनमाली यांनी पटकथा लेखन केले. आणि नाव ठरले, आंधी .

आंधी प्रदर्शित झाला. त्याला रसिकांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत होता, सुचित्रा सेनने साकारलेली भूमिका तात्कालिक पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर बेतली आहे असे म्हटले जात होते. पण गुलजार यांनी एका मुलाखतीत भाष्य केले, असे अजिबात नाही. हा गैरसमज आहे. चित्रपट लिहिताना व दिग्दर्शित करताना असा कोणताही विचार नव्हता. गुलजार यांचे म्हणणे काहीसं बाजूला पडले. अशातच गुजरात राज्यातील विधानसभा निवडणुक आली आणि त्यात या चित्रपटात एका दृश्यात आरती देवी दारु सेवन करते या दृश्याचा विरोधी पक्षाकडून वापर करण्यात आला. हा चित्रपट निवडणूक आचार संहितेचा भंग करतोय या कारणास्तव या चित्रपटावर आणीबाणीत बंदी घालण्यात आली.

आंधी दिल्लीत प्रदर्शित होताना पोस्टरवर म्हटले होते, आजाद भारत की एक महान महिला नेता की कहानी... तर हैदराबाद येथील पोस्टरवर म्हटले होते, परदे पर देखिए अपने प्रधानमंत्री को... आजही विविध कारणास्तव आणीबाणीच्या दिवसां'चा उल्लेख होता ( उदा. कंगना राणावतचा इमर्जन्सी या चित्रपटाचे अलिकडेच झालेले प्रदर्शन)

आणीबाणीच्या काळात सामना व आंधी या चित्रपटातील गाण्यांची लोकप्रियता वाढत राहिली आणि त्याचाही या चित्रपटांना आणीबाणीनंतर ते प्रदर्शित होत असताना बराच फायदा झाला. आजही या दोन्ही चित्रपटातील गाणी लोकप्रिय आहेत.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

'आंधी'मधील गुलजार यांचा एक संवाद फारच गाजला.

चित्रपटातील राजकीय पक्षाचा कारभार सांभाळणारा चंद्रसेन ( ओम शिवपुरी) एका वृत्तपत्राच्या संपादकास म्हणतो, इलेक्शन के पहले आप हमारा खयाल रखिये, उसके बाद हम आपका...

यासह मदन मोहला निर्मित दिग्दर्शित दस नंबरी या चित्रपटात मोठ्याच प्रमाणावर हिंसा आहे या कारणास्तव बंदी घालण्यात आली. या चित्रपटात मनोजकुमार, हेमा मालिनी, प्राण, प्रेमनाथ, बिंदू, कामिनी कौशल इत्यादींच्या प्रमुख भूमिका होत्या. मुंबईत सुपर चित्रपटगृहात या चित्रपटाने शंभर दिवसाचे यश साध्य करुन त्याची पुढील वाटचाल सुरु असतानाच हा चित्रपट चित्रपटगृहातून उतरवावा लागला. विशेष उल्लेखनीय गोष्ट हा चित्रपट १९७६ सालचा असून ऐन आणीबाणीत सेन्सॉर संमत झालाही होता. अशातच केन्द्रीय माहिती व प्रसारण खात्याने चित्रपट सेन्सॉर संदर्भात काही कडक नियम लागू केले, त्यात चित्रपटातील अनावश्यक हिंसेवर कात्री असेही होते. याचा या चित्रपटाला फटका बसला.

आणीबाणीत बंदी आल्याने प्रचंड गाजलेला चित्रपट म्हणजे, अमृतलाल नाहटा निर्मित व दिग्दर्शित किस्सा कुर्सी का . हा एक राजकीय व्यंग्यात्मक चित्रपट होता. पण त्यात सरकारी धोरणाविषयी भाष्य करण्यात आल्याचा ठपका ठेवून त्यावर बंदी घालण्यात आली. या चित्रपटात रेहाना सुलतान, शबाना आझमी, राज बब्बर, राज किरण, उत्पल दत्त, मनोहर सिंग इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटावरची बंदी खूपच मोठ्या प्रमाणावर गाजली. विशेषत: किस्सा कुर्सी का असे म्हणतच या बंदीची आणि त्यासह अन्य चित्रपटांवरच्या बंदीची दखल घेतली गेली. आणीबाणीनंतर या चित्रपटाचे पुन्हा चित्रीकरण करुन तो प्रदर्शित करण्यात आला. तात्पर्य, निर्मात्यांनी अजिबात हार मानली नाही. त्यांनी आणीबाणी उठण्याची वाट पाहिली.

आय.एस. जोहर हा एक उपद्व्यापी सिनेमावाला म्हणून ओळखला जाणारा. विशेषत: नामवंत कलाकारांशी साम्य असलेले चेहरे घेऊन चित्रपट निर्मिती व दिग्दर्शन करण्यात तरबेज आणि त्यात तो यशस्वीही ठरे. त्याने आणीबाणीच्या काळातील वीस कलमांतील नसबंदी या गोष्टीवर व्यंग्यात्मक असा नसबंदी या नावाचा चित्रपट निर्माण केला. चित्रपटात राकेश खन्ना (राजेश खन्ना), अनिताव बच्चन (अमिताभ बच्चन), सेव आनंद (देव आनंद) असे नकली चेहरे होते, पण चित्रपटाच्या मांडणीत नसबंदी योजनेची हुर्यो उडवल्याने सेन्सॉरने आक्षेप घेतला. त्यामुळेच आय.एस. जोहर यांस माघार घ्यावी लागली आणि आणीबाणी उठायची वाट पहावी लागली. या चित्रपटाला रसिकांनी स्वीकारले नाही.

लेख टंडन दिग्दर्शित आंदोलन चित्रपट आणीबाणीत सेन्सॉरच्या तावडीत सापडला. राकेश पांडे व नितू सिंग यांच्या या चित्रपटात भूमिका होत्या. सरकारी धोरणाविरोधात भूमिका घेतलेल्या कलाकृतींवर सेन्सॉर बोर्डाची अतिशय कडक नजर असे.

दिग्दर्शक आनंद पटवर्धन यांच्या क्रांती की तरंगे या माहितीपटावरही आणीबाणीत बंदी आली. पट्टाभि रामरेड्डी दिग्दर्शित चंदा मारुथा या कन्नड भाषेतील चित्रपटावरही आणीबाणीत बंदी आली. या चित्रपटातील नायिका व रामरेड्डी यांची पत्नी स्नेहलता यांना तर काही दिवस अडकही झाली होती.

आणीबाणीला पन्नास वर्ष पूर्ण झाली असतानाच त्यात काही चित्रपटांवर आलेल्या बंदीची दखल हवीच...

---

# आषाढी एकादशी

आषाढी एकादशी जिला देवशयनी एकादशी असे देखील म्हणतात. ही देवशयनी एकादशी आषाढ महिन्यात येते म्हणून तिला आषाढी एकादशी म्हणून ओळखले जाते. आषाढी एकादशीला भगवान पांडुरंगाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील काना कोपऱ्यातून लाखो वारकरी (पांडुरंगाचे भक्त) विठ्ठल नामाचा गजर करत पंढरपूरला पायी चालत जातात. यालाच पंढरीच्या पांडुरंगाची वारी असे म्हणतात. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा हा सर्वात मोठा आनंद उत्सव आहे.

दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्रातील पंढरपूर हे गाव सोलापूर जिल्ह्यामध्ये आहे. वारकऱ्यांचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेले पंढरपूर भीमा नदीच्या काठावरती वसलेले आहे. भीमा नदीला पंढरपूर मध्ये चंद्रभागा असे देखील म्हणतात, कारण पंढरपुरात तीचे पात्र चंद्राकृती आहे. तसेच प्रजापती दक्ष यांनी चंद्राला श्राप दिला होता, चंद्रदेवाने या नदीमध्ये स्नान केल्यामुळे तो श्रापातुन मुक्त झाला आणि चंद्राचा शीनभाग गेला म्हणून भिमानदीला चंद्रभागा असे म्हणतात.

कुंभ नावाच्या दैत्याचा मुलगा मृदुमान्य याने देवतांचा छळ करून त्याची सर्व सत्ता बळकावली त्यामुळे सर्व देव त्याच्या भीतीने त्रिकुट पर्वतावरील एका गुहेमध्ये लपून बसले. परंतु तो दैत्य त्यांचा पाठलाग करत त्या गुहेच्या दरवाजाजवळ थांबला. यामुळे घाबरलेल्या सर्व देवांना उपवास घडला आणि त्यांच्या श्वासातून एक दिव्या स्त्री निर्माण झाली. तो दिवस होता आषाढ शुद्ध ११. सर्व देवतांनी त्या स्त्रीचे नाव एकादशी ठेवले. या एकादशीने मृदुमान्य दैत्याचा वध करून देवतांना संकटमुक्त केले.

याच दिवशी भगवान श्री विष्णू हे विश्राम करण्यासाठी क्षीरसागरात योगनिद्रेत जातात. त्यामुळे या एकादशीला देवशयनी एकादशी म्हणतात. या दिवसापासून चातुर्मास प्रारंभ होतो. आषाढ महिन्यातील देवशयनी एकादशीपासून ते कार्तिक महिन्यातील देवप्रबोधनी एकादशीपर्यंत भगवान श्री विष्णू हे निद्रिस्त असतात. या ४ महिन्याच्या कालावधीला चातुर्मास असे म्हणतात.

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र कसे निर्माण झाले?

पुंडलिका भेटी परब्रम्ह आले गां, चरणी वाहे भीमा उद्धरी जागा.

प्रभू श्रीरामांचे पूर्वज इक्ष्वाकु यांचा नातू व मांधाताचा मुलगा मचकुंद हे देव आणि दानवांच्या युद्धामध्ये देवतांना मदत करण्यासाठी स्वर्गात गेले. दानवांचा नाश करून देवांना विजय मिळवून देणाऱ्या मचकुंदाने काहीतरी मागावे अशी इंद्रदेवाने त्यांना विनंती केली. मी अत्यंत थकल्यामुळे मला निवांत झोप द्या अशी मचकुंदाने इंद्रदेवाकडे मागणी करताच आपण झोपल्यावर कोणी उठविले व आपली दृष्टी त्याच्यावर पडली तर ती व्यक्ती जळून भस्म होईल. इंद्रादेवाने असा वर मचकुंदला दिला. त्यानंतर थकलेला मचकुंद एका गुहेत येऊन झोपला.

यानंतर बराच काळ लोटला, भगवान श्रीकृष्णाचा काळ सुरू झाला. कालयवन नावाचा एक वीर योद्धा होता त्याने नारदमुनींना विचारले की माझ्याबरोबर युद्ध करेल असा धरतीवर कोणी वीर आहे का? त्यावर नारदमुनींनी त्याला श्रीकृष्णाचे नाव सुचवले. मग कालयवन श्रीकृष्णाकडे युद्धासाठी निघाला. त्याच वेळी कंसाचा सासरा जरासंध त्याच्या मुलींना वैधव्य आले म्हणून तो ही श्रीकृष्णासोबत युद्ध करण्यासाठी निघाला होता. या सर्व प्रकारामध्ये जनतेची कुठलीही हानी होऊ नये म्हणून भगवान श्रीकृष्णाने गुजरात प्रांतातील समुद्रकिनारी द्वारका नगरी तयार केली आणि मथुरेतील सर्व लोकांना तिथे सुखरूप नेऊन ठेवले.

दुसऱ्या दिवशी श्रीकृष्ण स्वतः मथुरेच्या वेशीजवळ निशस्त्र एकटेच बाहेर आले आणि जवळच असलेल्या पर्वताकडे पळू लागले जिथे मुचकुंद झोपलेला होता. हे बघून कालयवनाने त्यांचा पाठलाग केला. श्रीकृष्णाने त्यांचा शेला मुचकुंदच्या अंगावरती टाकला आणि बाजूला लपून बसले. कालयवन गुहेत आल्यानंतर त्याला असे वाटले श्रीकृष्ण थकल्यामुळे तिथे झोपला असावा म्हणून त्याने त्याच्यावर प्रहार केला आणि मुचकुंद झोपेतून जागा झाला आणि त्याची दृष्टी कालयवनावर पडली इंद्राच्या वरदानाप्रमाणे तो भस्म झाला.

त्यानंतर श्रीकृष्ण मुचकुंदासमोर आले. श्रीकृष्णाचे मनोहर रूप पाहून तो आनंदित झाला. श्रीकृष्ण मुचकुंदाला म्हणाले तू मला वाचवलेस काहीतरी माग. त्यावर मुचकुंद म्हणाला या जन्मामध्ये माझ्याकडून युद्ध आणि झोप याशिवाय काहीच झाले नाही. मला भक्ती करून ब्रह्मानंद मिळविण्याची फार इच्छा आहे. त्यावेळेला श्रीकृष्ण म्हणाले पुढच्या जन्मी तू पुंडलिक या नावाने जन्म घेऊन माझा भक्त होऊन जगप्रसिद्ध होशील.



भक्त पुंडलिक कोण होता?

मुचकुंद पुढे जानूदेव आणि मुक्ताबाई या ब्राम्हण दाम्पत्याच्या घरी पुंडलिक या नावाने पंढरपूर मध्ये जन्माला आला. पुंडलिक लग्नानंतर बाईल वेडा झाला होता. त्याने बायकोला खांद्यावर घेऊन आई वडिलांसोबत काशी यात्रेला निघाला.

वाटेत मुक्कामासाठी ते कुक्कुट मुनींच्या आश्रमात थांबले. पुंडलिक जेव्हा पहाटे उठला तेव्हा त्याला अनेक सुंदर स्त्रिया आश्रमाची झाडलोट आणि सडा रांगोळी करताना दिसल्या त्याने त्या स्त्रियांना विचारले तुम्ही कोण आहात? तेव्हा त्यांनी सांगितले आम्ही गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, कावेरी, कृष्णा इत्यादी नद्या स्त्री रूप धारण करून मातृ पितृ भक्ती करणाऱ्या कुक्कुट मुनींच्या सेवेसाठी इथे येतो इतके सांगून नद्या अदृश्य झाल्या. परंतु त्यांचे हे बोलणे ऐकून मात्र पुंडलिकाला पश्चाताप झाला. तो आई वडिलांना घेऊन परत पंढरपूरला आला आणि त्यांची सेवा करू लागला.


पांडुरंग पुंडलिकाला भेटण्यासाठी पंढरपूरला का आले?

पुढे काही कारणाने माता रुक्मिणी भगवान श्रीकृष्णावर रुसून पंढरपुरातील दिंडीरवनामध्ये (चिंचेच्या वनात) आल्या. त्यांचा शोध घेण्यासाठी श्रीकृष्ण देखील पंढरपूरमध्ये आले. रुख्मिणीचा शोध घेता घेता ते पुंडलिकाच्या घराजवळ आले. माता पित्याबद्दल पुंडलिकाची भक्ती बघून श्रीकृष्ण त्याला भेटण्यासाठी गेले. देवाने पुंडलिकाला हाक मारली तेव्हा पुंडलिकाने त्याच्या जवळील वीट देवाकडे फेकली आणि या विटेवरती आपण उभे राहा अशी देवाला प्रार्थना केली. विटेवरती उभा राहिला तो श्री विठोबा. श्री विठोबा पुंडलिकाची भक्ती बघून तिथेच रामाला आणि सर्व भक्तांचा उद्धार करीत पंढरपूरला विटेवरती उभा आहे. भक्त पुंडलिकामुळे श्री विठ्ठल आषाढी एकादशीला पंढरपूरमध्ये आले म्हणून या एकादशीला फार महत्त्व आहे. **(साभार: इंटरनेट)**

---

# श्यामाप्रसाद मुखर्जी

श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा जन्म ६ जुलै १९०१ रोजी कलकत्त्यातील एका संपन्न घरात झाला होता. त्यांचे वडील आशुतोष मुखर्जी हे कलकत्ता उच्च न्यायालयात न्यायाधीश होते. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभ्यासात आवड आणि गती होती. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांना बंगाली साहित्य आणि इंग्रजी साहित्याची विशेष ओढ होती.



कलकत्ता विद्यापीठातून पदवी घेतल्यानंतर १९२३मध्ये ते विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य बनले. पुढे लंडनला जाऊन ते बॅरिस्टर बनले. पुन्हा भारतात आले आणि अध्यापन करू लागले. वयाच्या अवघ्या ३२व्या वर्षीच ते कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू बनले होते.

पुढे जनसंघाची स्थापना करणारे मुखर्जी हे आधी काँग्रेसचे सदस्य होते, असं सांगितलं तर कुणाला खरं वाटणार नाही.कलकत्ता विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून काँग्रेसच्या उमेदवारीवर ते विधान परिषदेवर निवडून गेले होते, पण थोड्याच दिवसांत काँग्रेसशी मतभेद झाल्यावर त्यांनी राजीनामा दिला आणि नंतर ते अपक्ष उमेदवार म्हणून विधान परिषदेवर निवडून गेले.

१९४१मध्ये मुखर्जी बंगालचे अर्थमंत्री बनले. कृषक प्रजा पार्टीचे नेते ए.के. फजलूल हक यांच्याबरोबर त्यांनी सरकार स्थापन केलं होतं.१९४२ मध्ये 'चले जाव' आंदोलनावेळी बंगाल आणि देशाच्या इतर भागात ब्रिटिशांनी उचललेल्या कठोर पावलांविरोधात त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. १९४४मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी हिंदू महासभेचे सदस्य बनले आणि लगेच अध्यक्षपदही त्यांच्याकडे आलं. अल्पसंख्य मुस्लीम समाजाला बहुसंख्य हिंदूंच्या तुलनेत विशेष अधिकार मिळू नयेत, अशी त्यांची भूमिका होती.ज्या मुसलमानांना भारत सोडून पाकिस्तानमध्ये जायची इच्छा आहे, त्यांनी बॅग भरावी आणि चालते व्हावे, असं मुखर्जी यांनी एका सभेत म्हटलं होतं.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर काही महिन्यांतच महात्मा गांधींची हत्या झाली. या हत्येचा कट रचल्याच्या संशयाची सूई हिंदू महासभेच्या नेत्यांवर आली. मुखर्जी यांनी गांधीजींच्या हत्येचा निषेध केला आणि हिंदू महासभेचा त्याग केला.नेहरूंच्या मंत्रिमंडळात ते उद्योगमंत्रीदेखील झाले. पुढे नेहरू आणि लियाकत अली (पाकिस्तानचे पंतप्रधान) यांच्यामध्ये झालेल्या निर्वासितांबद्दलच्या करारानंतर मुखर्जींनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. नेहरूंची भूमिका ही मुस्लीम लांगूलचालनाची आहे, असा आरोप करत मुखर्जींनी आपल्या पदाचा १९४९ मध्ये पदत्याग केला.

१९५१ मध्ये त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर यांच्या सल्लामसलतीने जनसंघाची स्थापना केली आणि ते जनसंघाचे पहिले अध्यक्ष बनले. १९५२ला जनसंघाच्या तिकिटावरच त्यांनी निवडणूक लढवली आणि दक्षिण कलकत्ता या मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून ते लोकसभेत गेले.

समान नागरी कायदा, गोवंश हत्याबंदी कायदा, जम्मू काश्मीरला इतर राज्यांप्रमाणे समान दर्जा या मागण्या मुखर्जी यांच्या होत्या. सुरुवातीपासूनच मुखर्जी यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचं समर्थन केल्याचं दिसतं.काश्मीरचं आंदोलन हा मुखर्जी यांच्या आयुष्याचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणता येईल. स्वातंत्र्यानंतर काश्मीरला विशेष दर्जा मिळाला होता आणि त्याचा मुखर्जींनी सुरुवातीपासूनच विरोध केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काश्मीरमध्ये 'जम्मू प्रजा परिषदे'ची स्थापना केली होती. मुखर्जी यांनी वेळोवेळी नेहरूंची भेट घेऊन हा मुद्दा मांडला. लोकसभेतही ते हा मुद्दा मांडत असत. काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करायचा असेल तर एक मोठं आंदोलन करण्याची तयारी मुखर्जी यांनी केली होती. त्यावेळी जर काश्मीरमध्ये जायचं असेल तर सरकारची परवानगी घेणं आवश्यक असे. मुखर्जींना ही परवानगी देण्यात आली नव्हती. ते म्हणायचे जर तुम्ही म्हणता हा आपल्याच देशाचा भाग आहे तर परवानगी का घ्यावी लागते? ५ मार्च रोजी 'जम्मू-काश्मीर दिन' साजरा करण्याचं आवाहन मुखर्जी यांनी केलं होतं. देशभरात जनसंघाच्या वतीने भाषणं आणि सभांचं आयोजन करण्यात आलं होतं. ५ मार्च रोजी दिल्लीत एक मोठी सभा झाली होती. या सभेला हजारोंच्या संख्येने लोक आले होते.त्यानंतर त्यांनी देशभर दौरा करून काश्मीरचा प्रश्न लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. या काळात ते ग्वाल्हेर, इंदूर, जयपूर, कलकत्ता, मुंबई, बंगळुरू, पटियाला आणि पाटणामध्ये गेले.

मुखर्जी यांना श्रीनगर तुरुंगात काही तास ठेवल्यानंतर एका कॉटेजमध्ये नजरकैदेत ठेवण्यात आलं होतं तिथं राहत असतानाच त्यांची प्रकृती बिघडू लागली. सुरुवातीला त्यांची भूक गेली, मग त्यांना ताप आला. २२ जून रोजी त्यांना हार्टअटॅक आला. २३ जून १९५३ रोजी त्यांचे प्राण गेले.

**(साभार: इंटरनेट)**

# सुरळीत वीजपुरवठ्यासाठी गणेशमूर्तिकारांचे निवेदन

**पेण : प्रतिनिधी**

जगप्रसिद्ध गणपती मूर्तीच्या निर्मितीसाठी ओळखल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील मूर्तिकार गंभीर संकटाचा सामना करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. गणेश चतुर्थी २७ ऑगस्ट रोजी असल्यामुळे त्याआधीच मूर्ती पूर्ण करण्याचे एक प्रकारे आव्हान मूर्तिकारांपुढे आहे. यासाठी पेणमधील प्रत्येक मूर्तिकार हा दिवसरात्र झटत असल्याचे दिसून येत आहे, मात्र पेणमध्ये सध्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना सतत घडत असल्यामुळे मूर्तिकारांनी विद्युत महामंडळाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत लवकरात लवकर ही समस्या सोडविण्याची मागणी केलआहे.



पेणमध्ये गेले काही दिवस तालुक्यात विजेचा पुरवठा अपुरा आणि अनियमित असल्यामुळे गणपती मूर्तीच्या ऑर्डर्स वेळेत पूर्ण कारणे हे मोठे आव्हान ठरत आहे. गणपती मूर्तीच्या ऑर्डर्स पूर्ण करण्यासाठी कारखानदारांनी बँकांमधून प्रचंड प्रमाणात कर्ज घेतली आहेत. त्यामुळे पेणमधील कारखानदारांनी वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

आम्हा गणेशमूर्ती कारखानदारांवर कामाचा ताण जास्त असल्याने आम्हाला सध्या पेण येथील महावितरणाच्या कार्यालयात तक्रार करण्यासाठी देखील वेळ नाही. मात्र घराघरात सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे विद्युत महामंडळावरील रोष खुपच वाढला आहे. महावितरण कार्यालयाने त्वरित पेणमधील वीजपुरवठा विनाखंडित सुरू ठेवावा, गणपती कारखानदारांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असे या वेळी मूर्तिकार श्रीकांत देवधर यांनी सांगितले.

# रोहा पोलिसांनी केली गावठी दारू उद्ध्वस्त

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील सारसोली टिटवी जंगल परिसरात एका ओहोळाच्या ठिकाणी मोकळ्या जागेत गावठी हातभट्टी सुरू असल्याची गुप्त माहिती रोहा पोलिसाला मिळाली असता शुक्रवार (दि.४) पोलिसांनी धडक कारवाई केली. यामध्ये हातभट्टी साठी लागणारे रसायन व प्लास्टिकच्या टाक्या जप्त करण्यात आल्या .

दरम्यान टिटवी गावात रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांना जंगल परिसरात गावठी हातभट्टी सुरू असल्याची माहिती मिळतात. टीम नियोजन करून १४ प्लास्टिक व चार लोखंडी एकूण १८ टाक्यांमध्ये ३१५० लिटर गुळ रसायन मिश्रित प्रतिलिटर ६० रुपये प्रमाणे व १८ टाक्या ५०० प्रमाणे व ईतर भांडी २०, हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केले.

मिलिंद दामू झोरे, योगेश साहू झोरे, बाळाराम कोंडू होगाडे काशीराम बाबू ढेंबे वय सर्व आरोपी राहणार टिटवी सारसोली येथे राहणार असून आरोपींना अटक केले तर रोहा पोलीस स्टेशनचे उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर, निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास चालू आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोंकास कळविण्यात येते की, **श्री. आत्माराम सुदाम भगत,** वय- ८० वर्षे, पत्ता - घर नं. २४२, पोट माळा भगत आळी, सेक्टर १-ई, कळंबोली गाव, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६, यांना सिडको लि. यांनी लागू केलेल्या १२.५ टक्के भुखंड वाटप केलेला असुन सदरहु भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**वाटप करण्यात आलेल्या भुखंडाचे वर्णन**
**नोड कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| कामोठे | ०४ | ६ए | १४४९.८२ |

वरील भुखंडाचे मालक **श्री. आत्माराम सुदाम भगत** यांनी सदरहु भुखंड त्यांची मुले **श्री. मिलिंद आत्माराम भगत,** व **श्री. वैभव आत्माराम भगत,** यांना बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरीत केले आहे. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, या भुखंडाचा बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरणाचा व्यवहार माझे अशिल **श्री. मिलिंद आत्माराम भगत,** व **श्री. वैभव आत्माराम भगत,** यांनी केला असून सदर व्यवहार हा **श्री. आत्माराम सुदाम भगत** यांच्यावर बंधनकारक आहे व सदर कराराची पूर्तता **श्री. आत्माराम सुदाम भगत** करून देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तत्पूर्वी सदर कराराची पूर्तता करणे, तसेच सदर भुखंड हस्तांतरित करण्यापूर्वी तो निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे. जर सदरहू भुखंडावर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू भुखंडाचा बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, कळावे.

दिनांक : ०६/०७/२०२५

**श्री. योगेश स. बाष्टे,**
**(ॲडव्होकेट)**
पत्ता : ऑफिस क्रं. ७, तळमजला, जयनारायण को- हौ. सो. लि., गावदेवी मंदिराजवळ, पनवेल, जि. रायगड ४१०२०६ मो.नं.८८९८१२१९७१

# काशीद बीचवर नीरव शांतता अन् शुकशुकाट

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन पावसाचे दिवसात पर्यटकांनी पाठ फिरविल्याने नेहमीच गजबलेले असलेला काशिद समुद्र बीचला निरव शांतता होती.. काशिद समुद्र किनारी एकूणच शुकशुकाट चित्र दिसून आले.

पर्यटक क्षेत्र म्हणून अल्पावधीत प्रसिध्दीस आलेले मुरूड तालुक्यातील काशिद बीच, समुद्र किनारा नित्याने पर्यटकांनी गजबलेला असतो. ठिकठिकाणाहून पर्यटक काशिद येथे भेट देवून निसर्ग रम्य समुद्र किनाराचा आनंद लुटतात. दिवसाला हजारो पर्यटकांची हजेरी काशिद बीचला असते तर शनिवार, रविवार तसेच सुट्टीचा दिवशी पर्यटकांची मोठी गर्दी पहावयास मिळते. काशिद समुद्र किनारांवरील मउशार वाळू, झुळझुळणारा वारा पर्यटकांचे खास आकर्षण ठरते. येथील समुद्रात मोठया संख्येने पर्यटक पोहण्याचा आनंद लुटत असतात.

नेहमीच पर्यटकांनी फुललेले काशिद बीच परिसरात स्थानिकांनी पर्यटकांच्या गरजा पुरविणारी दुकाने थाटली आहेत. तसेच समुद्र किनारी स्पिड बोट, उंटवाले, घोडागाडी आदी सुविधा देखील स्थानिकांनी पर्यटकांसाठी उपलब्ध केल्या आहेत. दिवसेंदिवस काशिद समुद्र किनारा पर्यटकांचे खास आकर्षण ठरत आहे, त्यामुळे येथे पर्यटकाच्या संख्येत मोठी वाढ झालेली दिसते.

मात्र ऐन पावसाळयात काशिद बीचला पर्यटकांची अनुपस्थिती आहे, समुद्र किनारावर निरव शांतता पसरली असून परिसरात शुकशुकाट आहे. पर्यटक नसल्याने स्थानिकांनी सुध्दा येथे थाटलेली दुकाने बंद ठेवली आहेत. नेहमीच पर्यटकांच्या गर्दीने गजबलेला काशिद बीच परिसर ऐन पावसाळयात अगदीच निरव शांतता दिसते. फक्त अलिबाग ते मुरूड जा-ये करणारी लहान मोठी वाहने काशिद मुख्यः रस्ताने जा-ये करताना दिसतात.



# रा.जि.प. कुंभार्ते आदिवासीवाडी शाळेत बचत पेटी वितरण कार्यक्रम

**माणगाव : बातमीवर**

कुंभार्ते आदिवासी वाडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये शुक्रवारी (दि.४) शाळा बचत पेटी वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम औरज्ञान फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरतेविषयी जागरूकता निर्माण करणे आणि शालेय वयातच पैसे बचतीची सवय लावणे हा होता.



या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षण अधिकारी , पंचायत समिती माणगाव सुरेखा तांबट, शंकर शिंदे(केंद्रप्रमुख, उतेखोल) आणि संजय पालांडे (केंद्रप्रमुख, निजामपूर) यांनी उपस्थिती लावली. शाळेच्या मुख्याध्यापिका नम्रता मॅडम आणि सहाय्यक शिक्षक सागर यांनीही कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये बचतीचे महत्त्व, पैशांची किंमत, आणि नियोजनशीर खर्च याची सवय लागणे ही आजच्या काळाची गरज आहे. लहान वयातच आर्थिक शिस्त लावल्यास विद्यार्थी भविष्यात जबाबदार नागरिक बनतात. शाळा बचत पेटी हे एक छोटे पण प्रभावी साधन आहे, जे विद्यार्थ्यांना थोडी थोडी बचत, मोठं भविष्य या तत्त्वाची ओळख करून देतं.

या उपक्रमामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला गुल्लक देण्यात आली. यामागील हेतू हा आहे की, विद्यार्थ्यांनी त्यांच्या खिशातील पैसे, उरलेली शालेय फी किंवा अन्य लहान रक्कम गुल्लकमध्ये साठवावी आणि दर महिन्याला किती बचत झाली हे शिक्षकांच्या मदतीने मोजावे.

कार्यक्रमात औरज्ञान फाउंडेशनच्या संचालिका अमिता मिश्रा आणि प्रोजेक्ट को ऑर्डिनेटर कमलाकर सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना अर्थसाक्षरतेचे महत्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, आजची लहान बचत उद्याचं मोठं साधन ठरू शकतं. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित बचत करणे आणि त्याचे नियोजन शिकणे आवश्यक आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. कमलाकर आंबो म्हात्रे, राहणार-मु दापोली, पो. पारगांव, ता. पनवेल, जि. रायगड यांनी **श्री. मनोज भगवान वाजेकर आणि श्री. उदय भगवान बाजेकर,** राहणार-पी/६/१५/४, शांतीवन अपार्टमेंट, आय.पी.सी.एल. कॉलनी जवळ, सेक्टर नं.१५, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६ यांचे मालकी हक्काची खालील वर्णनाची सदनिका त्यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाने आपले लाभात कायमस्वरूपी मालकी हक्कात हस्तांतरीत करून घेण्याचे योजले आहे.

**सदनिकेचे वर्णन**
**मौ- आकुर्ली, तालुका - पनवेल, जिल्हा- रायगड**

| सदनिका क्रमांक | मजला, बिल्डींग नंबर | बिल्डींगचे नाव | सर्व्हे/हिस्सा नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| युनिट नं. एच-१८०६ | १८वा मजला, बिल्डींग नं. १, फेज-२ | बालाजी सिम्फनी | सर्व्हे नं. १७३, हिस्सा नं.० | ४८.४७० चौ.मी. कारपेट + ७.८५० चौ.मी. बाल्कनी + १.५६० चौ.मी. सर्व्हिस स्लॅब, एकूण क्षेत्र ५७.८८० चौ.मी. |

वर नमूद सदनिकेस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यासकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद सदनिकेचे हस्तांतरण खरेदी आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाद्वारे कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.


**दिनांक :- ०५ /०७/ २०२५**
**ठिकाण :- पनवेल**

**सही/-**
**शरद रामचंद्र जाधव, वकील**
**(बी.कॉम. एलएल.बी.)**
नोंदणी क्र. एम् ए एच्-३५८६/२००८
कार्यालयीन पत्ता कार्यालय क्र. ००१.
तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३,
एम.सी.सी एच्. सोसायटी, पनवेल,
ता पनवेल, जि. रायगड-४१०२०६

# आषाढी एकादशीनिमित्त मुरूडमधील ओंकार विद्यामंदिरातर्फे वारी

**मुरुड : रामप्रहर वृत्त**


पंढरपूरच्या विठोबा-रखुमाई मंदीरात अवघ्या महाराष्ट्रातून माऊलीच्या दर्शनासाठी आषाढी वारी निमित्त भक्तांचा महापूर लोटत असतो. तद्वतच गाव - शहारांतील विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देखील आषाढी एकादशीच्या निमित्ताने उजळून निघतात. यंदा ५ जुलैला आषाढी एकादशीच्या पूर्व शाळा शाळांतून वारीचे दर्शन घडले.



शालेय जीवनात विठ्ठलाच्या वारीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी तसेच भक्ती मार्गाचा संस्कार बाल मनावर रुजविण्यासाठी मुरूड येथील हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार बालवाडी व ओंकार विद्या मंदीर येथील सुमारे२८० हून अधिक छोट्या शिशु बालांनी पारंपारिक वारकरी वेशात पददिंडी काढुन विठुरायाचा जयजयकार करीत, पताका मिरवित वारी काढुन आनंद घेतला . वरुण राजाने देखिल जोरदार हजेरी लावत या वारकऱ्यांचे स्वागत केले. या वारी मध्ये पालक - शिक्षक वृंदाचा सहयोग विद्यार्थ्यां इतकाच उस्फूर्त होता. लहानगी बालके वारीत टाळ चिपळ्यांचा गजरात ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करण्यात दंग झाली होती.

# डॉक्टर्स डे दिनी रोह्यातील डॉक्टरांचा ‘रोटरी’कडून सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**




रोटरी क्लब संस्थेचे नवीन वर्ष १ जुलै रोजी चालू झाले. या दिनाचे औचित्य साधून रोहा तालुक्यातील रोटरी क्लब ऑफ रोहा तर्फे नवनिर्वाचित अध्यक्ष रो. राजेंद्र पोकळे यांच्या निवासस्थानी डॉक्टर डे साजरा करण्यात आला. यावेळी रोह्यातील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.अशोक जाधव तसेच अन्य डॉक्टर मंडळींचा विशेष सन्मान करण्यात आला.

देशातील सर्व डॉक्टर्स बद्दल कृतज्ञता व्यक्त करत प्रातीनिधीक स्वरूपात रोटरी परिवारातील रोह्याचे सुप्रसिद्ध डॉक्टर मनीष वैरागी, डॉ. वीरेंद्र, डॉ.अनिल यादव, डॉ. प्रियांका धनावडे, डॉ.सुभाष म्हस्के, डॉ. श्रावणी एन. डॉ.साक्षी महाडिक, डॉ. अवनी डोईफोडे, डॉ.अमृता म्हस्के, डॉ. ऋतुजा पार्टे या डॉक्टरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

रोटरी क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र पोकळे, सचिव जयदेव पवार, खजिनदार भूषण लुमण यांच्यासह रोटरी क्लबचे सर्व सदस्य सहपरिवार उपस्थित होते. आपल्या दैनंदिन आयुष्यात आपण तंदुरुस्त आहोत की नाही याचे आत्मपरीक्षण करून आपल्याला निरोगी दीर्घायुष्य जगण्यासाठी स्वतःच स्वतःची काळजी कशी घ्यायला पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले.

## जाहिर नोटीस

प्रति,
भावेश लक्ष्मीदास सुचक
रा. बी-३०१, नीळकंठ गार्डन, बावन बंगलोजवळ, प्लॉट नं. २९-५, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड
} अपोलदार

**विरुध्द**

जाबदार

१. मंजूला रमणिकलाल राजा
रा. फ्लॅट नं. ८९-९४. चोथा मजला, बिल्डींग नं. १, बी विंग, पीरामल नगर, एस.व्ही. रोड, गोरेगांव वेस्ट, मुंबई
२. दमयंती प्रभूदास कोटेजा मयत तर्फे वारस
२/१. चंद्रेश प्रभुदास कोटेजा २/२. ब्रिजेश प्रभुदास कोटेजा
रा. एव्हरग्रीन वुड्स, सी/७०३ अंधेरी कुर्ला रोड, ए.रा.एस.ए. हॉटेलच्या समोर अंधेरी (पु) मुंबई ४०००६९
२/३. नम्रता चिराग ठक्कर
रा. ३०१, श्री. निकुंज बिल्डींग नं. २. एस. व्ही. रोड समोर, नरीमन टॉवर जवळ, खजुरीया टंक रोड, कांदीवली प. मुंबई ४०००६७
३. महेंद्र मोहनलाल ठक्कर
रा. ५०२, श्री सिद्धीविनायक सीएचएस बंदर पाखाडी रोड, गणेश चौक, पी.एन.बी. बैंक चारकोप मुंबई, उपनगर मुंबई ४०००६७
४. स्नेहल विपूल तन्ना
रा. W/0 विपुल तन्ना ठक्कर, फ्लॅट क्र ३. दुसरा मजला, १३३ नवलाल भवन व्ही.पी. रोड, गिरगाव, मुंबई ४००००४
५. कोमल कल्पेन सोढा
रा. बी/३०३ सुंदर बाग, मदुरदास रोड, कांदिवली वेस्ट ४०००६७
६. केवल मोहनलाल ठक्कर
रा. ५०२. श्री सिद्धीविनायक सीएचएस बंदर पाखाडी रोड, गणेश चौक, पी.एन.बी. बँक चारकोप मुंबई, उपनगर मुंबई ४०००६७
७. उप अधीक्षक भूमि अभिलेख, पनवेल
ता. पनवल, जि. रायगड

विषय :- मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील न.भू.क्र. ८३१/५/१ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ :- १.अर्जदार श्री. भावेश लक्ष्मीदास सुचक यांचा दि. ०६.०२.२०२४ रोजीचा अपील अर्ज,
२. इकडील पत्र क्र. अपील क्र. ४०/२०२४/ जा.क्र. १०७९ दिनांक १४/०५/२०२५

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करुन घेणेकामी सुनावणीची तारीख ०६/०८/२०२४, ०३/०९/२०२४, ०१/१०/२०२४, १२/११/२०२४, ०३/१२/२०२४, १७/१२/२०२४. ०७/०१/२०२५, २१/०१/२०२५, १३/०५/२०२५, २७/०५/२०२५, १७/०६/२०२५ व ०१/०७/२०२५ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख १५/०७/२०२५ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह **जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार** येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतफी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण :- अलिबाग**
**दिनांक :- ०५ /०७/ २०२५**

**सही/-**
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, मु. अलिबाग.**

# हरिहरेश्वरमध्ये अनोखा लावणी महोत्सव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील हरिहरेश्वर गावाने यंदा एक वेगळाच पायंडा पाडला - श्रिया ग्रो च्या संकल्पनेतून आणि ओमप्रकाश कोलथरकर यांच्या पुढाकारातून प्रथमच ‘भात लावणी महोत्सव २०२५’ चा सुंदर अनुभव गावकऱ्यांनी आणि लहान मुलांनी घेतला.



गावात विकासाच्या नावाखाली शेतजमिनींवर होणारा अतिक्रमणाचा दबाव, निसर्गातील बदल, अतिवृष्टी, वादळे आणि माकडांचा उपद्रव यामुळे शेती ओस पडत चालली आहे. तर दुसरीकडे, शिक्षणाच्या मागे धावणारी तरुण पिढी शहराकडे वळतेय. पण शिक्षण कितीही असलं, शेतीकडून दूर गेल्यावर मातीची नाळ तुटते याचा विचार या महोत्सवाच्या माध्यमातून सगळ्यांनी केला.

ओमप्रकाश कोलथरकर आणि त्यांची मुलगी श्रिया यांनी हा उपक्रम राबवताना गावकऱ्यांना आणि मुलांना शेतीची महत्त्वाची शिकवण दिली पैसा असू शकतो, पण धान्य उगवण्याची कला हरवू नये!

महोत्सवात पंचक्रोशीतील मान्यवर, ग्रामस्थ, महिला, तरुण-तरुणी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले. रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरिहरेश्वर आणि मारळ येथील लहान मुलांना पारंपरिक पद्धतीने भात लावणी कशी करतात, त्याचा अनुभव देण्यात आला. गीत गात, चिखलात खेळत, नाचत - शेतीचा आनंद त्यांनी लुटला.

श्रीवर्धन पंचायत समितीचे कृषी सहाय्यक, गावातील अनुभवी शेतकरी आणि अन्य तज्ज्ञांनी शेतीच्या नव्या शक्यता, बदलत्या हवामानातील तंत्रज्ञान आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात माजी उपसरपंच विजय वासुदेव पाटील यांनी आशा व्यक्त केली की, आज ही मुले उद्या प्रगतशील शेतकरी, कृषी अधिकारी होतील. शहराकडे जाण्याआधी शेतीची महत्त्व जाणून घ्यावी.

शाळेचे मुख्याध्यापक जयवंत लाखन यांनी शेती म्हणजे केवळ व्यवसाय नाही, तर जगण्याचं मुळं आहे ओमप्रकाश कोलथरकर यांनी इंजिनियर असूनही आपल्या पूर्वजांच्या व्यवसायावर प्रेम दाखवत हा महोत्सव यशस्वी केला.त्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# जबरी चोरी करणारे सराईत गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

मोबाईल फोन जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास खांदेश्वर पोलिसांनी गजाआड करून त्याच्याकडून चोरीचे मोबाईल हस्तगत केले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात होत असलेल्या मोबाईल फोन जबरी चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त मिलींद भारंबे व पोलीस सह आयुक्त संजय एनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त दिपक साकोरे तसेच पोलीस उपायुक्त, परि ०२, पनवेल प्रशांत मोहिते, सहा पोलीस आयुक्त, भाउसाहेब ढोले यांनी वेळोवेळी केलेल्या सुचनांनुसार खांदेश्वर पोलीस ठाणे काही गुन्हे दाखल झाले होते.

यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे, पोनि (गुन्हे) सचिन परदेशी यांच्या सुचनेनुसार गुप्त बातमीदारांच्या प्राप्त माहीती वरून वर



नमूद गुन्हे करणारे आरोपी जयेश सुरेश कांबळे (वय २१, रा, आदईगाव ता. पनवेल) व त्याचा सहकारी विनायक संतोष जाधव (वय १९, आकुर्ली ता. पनेवल यांना सेक्टर १९, नवीन पनवेल) येथून सापळा कारवाई करून शिताफिने ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

आरोपींकडे केलेल्या तपासात आरोपीकडून गुन्हयातील जबरीने चोरी करून नेलेले एकूण चार मोबाईल फोन व गुन्हयासाठी वापरलेली एक ॲक्टीव्हा मोटार सायकल असे एकूण ७७,६००/- किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.आरोपींकडून खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल फोन चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

कारवाई पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले, वपोनि स्मिता ढाकणे, पोनि (गुन्हे) सचिन परदेशी, खांदेश्वर पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्वर पोलीस ठाणेचे सपोनि प्रताप बंडगर, शरद बरकडे, हवालदार महेश कांबळे, उदय देसाई, रणजित पाटील, धिरेंद्र पाटील, शिपाई विकास कामनुकर, युवराज शिवगुंडे, सचिन पवार, स्वप्निल कोळी, संदीप तरटे, नाझीरकर, परदेशी यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोनि बंडगर करीत आहेत.

# आवरे गावात क्रॉपसॅप अंतर्गत शेतीशाळा

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील आवरे गावात क्रॉपसॅप अंतर्गत शेतीशाळा वर्गाचा दुसरा वर्ग घेण्यात आला. या वर्गाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी पनवेल खारभूमी संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. वहाने, तालुका कृषी अधिकारी आर. टी. नारनवर, यांनी शेतकऱ्यांना खरीप हंगामी शेती विषयी मार्गदर्शन केले. या वेळी उपकृषी अधिकारी एस.व्ही. लोहकरे, सहाय्यक कृषी अधिकारी ए.आर. राठोड उपस्थित होते.

दरम्यान या वेळी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनात्मक विविध प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. यामध्ये, बॅलेट बॉक्स टेस्ट घेण्यात आली, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या प्राथमिक ज्ञानाचे अवलोकन करण्यात आले. तसेच, शेतकऱ्यांचे छोटे-छोटे गट तयार करून त्यांना सामूहिक शेती आणि गटचर्चेसाठी प्रोत्साहित करण्यात आले.

या वर्गाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे शेतकऱ्यांनी भात रोपवाटिकेचे निरीक्षण करणे. यामुळे त्यांना प्रत्यक्ष शेतात जाऊन रोपांची वाढ आणि आरोग्य तपासण्याची संधी मिळाली. आधुनिक पद्धती, बियाणे निवड आणि पीक व्यवस्थापन यावर भर देण्यात आला. विशेष म्हणजे खारभूमी आवरे गावासाठी खारभूमी व्यवस्थापनाबद्दल डॉ. वहाने यांनी मोलाचे मार्गदर्शन केले, शेतीशाळेला आवरे



गावातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शेतकऱ्यांनी सक्रियपणे चर्चासत्रांमध्ये भाग घेऊन, आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या वर्गामुळे शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान आणि पद्धतींची माहिती मिळाल्याने त्यांच्यात समाधान दिसून आले. भविष्यात अशाच प्रकारे क्रॉपसॅप अंतर्गत अधिक शेतीशाळा आयोजित करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली.





**नवीन पनवेल : श्री श्री जगन्नाथ संस्कृती सेवा ट्रस्ट पनवेल यांच्या वतीने जगन्नाथ मंदिरात रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या रथयात्रेला आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला माजी नगरसेवक संतोष शेट्टी, संतोष राम, जादुमणी चक्रा, रणजीत दास, गंधम व्यंकटराव, अक्षय सिंग यांच्यासह जगन्नाथ संस्कृती सेवा ट्रस्ट आणि बालाजी मंदिराचे ट्रस्टी उपस्थित होते. दरम्यान, या वेळी प्रभाग क्रमांक १६चे अध्यक्ष शिवाजी भगत यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# खारघरमधील अभिनय प्रशिक्षण शिबिराला लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे व नाट्य परिषद शाखा पनवेलचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरास शनिवारी (दि.५) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली.

या वेळी त्यांच्यासमवेत जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख,तसेच पब्लिक स्कूलच्या समन्वयक श्रीमती




चष्मिंदर बक्षी, पनवेल मनपाचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा पनवेलचे कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सहकार्यवाह स्मिता गांधी, तसेच प्रशिक्षक अशोक केंद्रे, प्रा. रवी धुतडमल, संकेत खेडकर,शाळेच्या शिक्षिका उपस्थित होत्या.

श्री. ठाकूर यांनी या वेळी शिबिरार्थी मुला-मुलींसमवेत संवाद साधला. मुलांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. तसेच त्यांनी शिबिरात होत असलेल्या उपक्रमांची माहिती घेतली.शिबिराला मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहून रामशेठ ठाकूर यांनी समाधान व्यक्त केले. तसेच शिबिराच्या पुढील कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

महापालिका कार्यक्षेत्रात खारघर प्रभागात प्रथमत: अशा पध्दतीचे शिबिर आयोजित करण्यात आले असून, पालिका कार्यक्षेत्रात सांस्कृतिक चळवळ अधिक रूजण्यासाठी या शिबिराचा उपयोग होणार आहे. पनवेलमधील नाट्यकलावंतांना अभिनयाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळावे याकरिता अशा प्रकारचे शिबिर घेणे आवश्यक आहे आणि त्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेऊन आखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेच्या सहकार्यातून हे अभिनय प्रशिक्षण आयोजित केले आहे.



# पनवेलच्या महात्मा फुले कॉलेजमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल तालुक्यातील महात्मा फुले आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजमधील ग्रामीण विकास विभागाच्या टीवायबीएच्या २०१४-१५च्या बॅचचा स्नेहमेळावा शुक्रवारी (दि.४) उत्साहात झाला.

उपस्थित सर्व माजी विद्यार्थी १० वर्षांनी आपल्या जुन्या मित्रमैत्रिणींना भेटले. सर्वांच्या भेटीगाठी झाल्यावर जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमाला १५हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. सुरुवातीला ग्रामीण विकास विभाग प्रमुख डॉ. आर.पी. म्हात्रे आणि प्रा. डॉ. प्रफुल्ल वशेणीकर या सरांचे विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देत स्वागत केले. यानंतर सर्वांनी अल्पोपहार करून फोटो काढले. शेवटी शुभेच्छा देत व पुन्हा भेटण्याचे आश्वासन देत सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर आणि विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.५) सांस्कृतिक समितीच्या वतीने महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन घेतली. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मेंटल हेल्थ हा पोस्टर मेकिंगसाठी विषय देण्यात आला होता.

या पोस्टर मेकिंग स्पर्धेचा माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व, समस्या आणि उपाय यावर प्रकाश टाकणारे सृजनशील पोस्टर सादर केले तसेच मानसिक आरोग्याविषयी जागरूकता ही केली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान केला व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा समन्वयक सांस्कृतिक समिती यांनी केले.



# फुंडे विद्यालयात वारकरी दिंडी व वृक्षदिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा सण म्हणजेच आषाढी एकादशी होय. आषाढी एकादशी निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठल नामाच्या जयघोषात रंगून गेला आहे. वारकरी पंढरपुराच्या दिंडीत सहभागी झाले असताना फुंडे हायस्कूलचे विद्यार्थीदेखील वारकरी दिंडीत रममाण झाले.

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक विद्यालय फुंडे येथील विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी व वृक्षदिंडी मंगळवारी (दि.५) नवघर गावात काढण्यात आली होती. सुरुवातीला विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते विठुरायाच्या पालखीचे पूजन करण्यात आले. एस डी म्हात्रे, एच एन पाटील, एस डी नाईक, पी. ए. पाटील, सर्व सेवक आणि विद्यार्थी यांनी आरती म्हटली. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल भक्तीचा गीतांवर अप्रतिम नृत्य सादर केले. अस्मिता पाटील मॅडम यांनी बसवलेल्या लेझीम पथकानेदेखील उत्तम सादरीकरण केले. इयत्ता दहावी ब च्या वर्गाने वर्गशिक्षक एम.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची छान तयारी केली होती.

तदनंतर टाळ, विठू नामाचा जयघोष आणि लेझीमच्या तालावर विद्यार्थ्यांच्या वारकरी दिंडी आणि वृक्ष दिंडीने नवघर गावाकडे प्रस्थान केले. नवघर ग्रामस्थांनी वारकरी दिंडीचे मनःपूर्वक स्वागत केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार



वाटप करण्यात आला. कुमार नचिकेत म्हात्रे आणि लक्ष्मी मोटे, रक्षिता पंडीत, शिवतेज गायकवाड या विद्यार्थ्यांनी सुरेल आवाजात भक्तीगीतांचे गायन करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

या वेळी नवघर ग्रामपंचायत सरपंच सविता मढवी, उपसरपंच संध्या पाटील व स्कूल कमिटी सदस्य विश्वास तांडेल, ग्रामपंचायत सदस्य, माजी उपसरपंच रवी वाजेकर, ग्रामसुधारणा मंडळ अध्यक्ष प्रणय कडू, योगेश तांडेल, नवेल तांडेल, भूपेंद्र पाटील, प्रशांत पाटील, संकेत तांडेल, अजय भोईर, कल्पेश जोशी उपस्थित होते. ही दिंडी यशस्वी होण्यासाठी उरण वाहतूक शाखा आणि उरण पोलीस स्टेशन या दोन्ही पोलीस अधिकारी वर्गाचे उत्तम सहकार्य लाभले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी मिळून या कार्यक्रमाचे छान नियोजन केले होते.

# सत्याग्रह वसतिगृहातील प्रवेशाबाबत आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील सीबीडी- बेलापूर येथील अशोक हॉस्टेल, यशोधरा मुलींचे हॉस्टेल, खारघर आणि सत्याग्रह हॉस्टेल, तळोजा, येथे मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृहाची सोय राहुल शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या वतीने निशुल्क करण्यात आली असल्याचे प्रा.डॉ.जी.के. डोंगरगांवकर यांनी कळविले आहे.

चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून मुंबई महानगर प्रदेशातील अल्पकालावधीचे कौशल्य, उद्योजकता, तांत्रिक व रोजगाराभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणारया सर्व संवर्गातील ३० मुली आणि ५० मुलांसाठी प्रशिक्षण कालावधीत राहण्याची व भोजनाची सोय वरील ठिकाणी करण्यात आली आहे. विशेषतः झोपडपट्टीत वास्तव्यास असलेल्या, स्थानिक प्रकल्पग्रस्त आणि कोकणातील ग्रामीण भागातील शेतमजूर, आदिवासी समाजातील मुला-मुलींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी केले आहे.

प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर वसतिगृहात प्रवेश दिला जाईल. राहुल शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचा हा स्वयंआधारित उपक्रम असून शासन अथवा अन्य संस्था/कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा मदत घेतली जात नाही वा घेतली जाणार नाही, असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्था, सम्राट अशोक संशोधन संस्था, राजश्री शाहू एआय प्रशिक्षण केंद्र, आणि सत्याग्रह संशोधन केंद्र येथे पाली भाषा प्रमाणपत्र प्रशिक्षण, शालेय शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी अशोक संशोधन संस्थेमार्फत संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारखी अल्पकालवधीची कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षणाची सोय इथं करण्यात आली आहे.

सत्याग्रह महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी हे अल्पकालवधीचे व्यवसायाभिमुख कोर्सेस नि:शुल्क करण्याचा निर्णय संस्थेने घेतल्याचेही डॉ. डोंगरगावकर यांनी जाहीर केले आहे.

शिक्षणाची डिग्री मिळवण्याची इच्छा असूनही शिक्षणापासून वंचित असलेल्या सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण पूर्ण करता यावे, यासाठी ५० टक्के सवलतीसह व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश दिला जाणार असून यासाठी गरजू, पात्र मुला-मुलींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यशोधरा मुलींचे हॉस्टेल कार्यवाहक डॉ. प्रज्ञा डोंगरगावकर, राजश्री शाहू एआय प्रशिक्षण केंद्र प्रमुख तथा पाली भाषेचे विभागप्रमुख प्रा. सतीश पवार यांनी पत्रकात नमूद केले आहे.

## तुर्भे येथे योग दिनाचा कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे येथे आपण जोशी प्रतिष्ठानच्या वतीने महिलांच्या साठी विशेष योग दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी वैद्य प्रशांत वाघमारे त्याचप्रमाणे वैद्य रीना देठे तसेच डॉ. नंदकिशोर जोशी त्याचप्रमाणे अरुंधती जोशी उपस्थित होत्या. महिलांचे दैनंदिन जीवन त्यामध्ये महिलांना येणाऱ्या समस्या महिलांच्या रोग व्याधी या दूर करण्यासाठी उपयोगी पडणारी साधना कशाप्रकारे करता येईल याचे सखोल मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले.

महिलांचे जीवन त्यामध्ये आहार योग यांचे संतुलन कशाप्रकारे राखले पाहिजे त्याचप्रमाणे शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखताना कोणत्या गोष्टीची काळजी घेतली पाहिजे याचेदेखील विवेचन पाहुण्यांनी केले.

# गव्हाण विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी व विठ्ठल रखुमाईच्या मूर्तींच्या पालखी मिरवणूकीने पर्यावरण रक्षण व वृक्ष संवर्धनाचा जयघोष केला.

विद्यालयाच्या प्रांगणात विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी तसेच ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख यांचे हस्ते पालखीचे पूजन करून विद्यार्थीनींनी डोईवर धारण केलेल्या तुळशी वृंदावने व इतर रोपांसह वृक्षदिंडी मार्गस्थ झाली.

विद्यार्थ्यांच्या सुरेल आरती गायनाने व उपशिक्षिका संपदा म्हात्रे, उपशिक्षक प्रशांत परदेशी व विशांत ठाकूर यांच्या अभंग गायनाने भक्तीमय वातावरण निर्मिती झाली.




या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलास लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, 'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, संजय उगले, संदीप भोईर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, निलेश गोडे, लेखनिक चंद्रकांत मढवी, महेश म्हात्रे, प्रमोद करावकर, शितलकुमार म्हात्रे, गणेश भोईर, चारुशीला ठाकूर, गीतांजली म्हात्रे, सारिका ठाकूर, उज्ज्वला म्हात्रे, वृषाली म्हात्रे, प्रतिज्ञा घरत, दर्शना माळी, माधुरी म्हात्रे, विद्या पाटील, ज्योत्स्ना कोळी, सोनाली घरत व दर्शना भोईर तसेच राजेंद्र चौधरी, डॉ. ॲड.सुवर्णा किर्लोस्कर, करुणा तांडेल, जयराम सोनटक्के आदी उपस्थित होते.

ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चौधरी, अर्चना पाटील, माणिक घरत व विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी लेझिम व झांज पथकाचे नेतृत्व केले. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाप्रमुख हर्षला पाटील यांनी वृक्षदिंडीचे आयोजन केले.

विद्यालयाच्या प्रांगणात फळा फुलांची रोपे विद्यालयाच्या इको क्लबच्या वतीने एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विद्यालयास भेट दिली.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, शिक्षक व पालक उपस्थित होते.

## निवडक

### खोपोली काजूवाडी येथे वृक्षारोपण



**खोपोली :** नगर परिषद व इनरव्हील क्लब खोपोली तर्फे काजूवाडी येथील पाण्याच्या टाकी जवळ वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी ६०० विविध प्रकारची झाडे लावण्यात आली या कार्यक्रमात मुख्याधिकारी पंकज पाटील व स्टाफ, इनरव्हिल क्लब खोपोली अध्यक्ष दिना शहा, सेक्रेटरी मधुमिता पाटील, माझी अध्यक्ष जयश्री कलोशी, खजिनदार दीपिका कोठारी, ज्येष्ठ मेंबर सुमित्रा महर्षी व नवीन सदस्य तारा उपस्थित होते. या वेळी मुख्याधिकारी व प्रशासक पंकज पाटील यांनी बोलताना आवाहन केले की प्रत्येक नागरिकांनी एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी घ्यावी.

### अशोक दांडेकर यांना सेवानिरोप



**मुरुड :** जंजिरा पंचायत समितीचे ग्रामपंचायत विस्तार अधिकारी या पदावर कार्यरत असलेले-अशोक अनंत दांडेकर हे ४० वर्षाच्या प्रदीर्घ सेवा करून सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा निरोप समारंभ मुरूड पंचायत समिती सभागृहात झाला. या वेळी मुरूड पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, म्हसळा तालुका पंचायत समिती गट विकास अधिकारी-माधव जाधव सहा.गटविकास अधिकारी मंगेश पाटील, संजय वानखडे, प्रदिप गायकवाड, आशिष मुकणे, प्रसाद माळी, वसंत दळवी, राजेश वाडेकर, महेंद्र दवटे, चेतन मगर, सुशांत ठाकुर, संतोष नागोठकर, विस्तार अधिकारी सुनील गायकवाड, दिलीप मेहता, दामोदर दिघीकर, किशोर नागे, संजय शेंडगे, व नथुराम भेकरे आदी उपस्थित होते.

### संदीप जैन ग्रुपच्या अध्यक्षपदी

**रोहे :** ट्विंकल फ्रेंड्स ग्रुपच्या नुतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष संदीप जैन, उपाध्यक्ष सुरेंद्र जैन, खजिनदार विलास गुजर यांची निवड करण्यात आली. या वेळी माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, भरत जैन, विनोद जैन, कैलास जैन, प्रशांत गुजर, सतीश जैन, राजेश जैन, प्रवीण जैन, कौशिक शहा, तायरीम रोहावाला, सेफी रोहावाला, संतोष खटावकर, धर्मेंद्र कुशवाह, पूनम कुशवाह, प्रमोद जैन, दिलीप जैन, दीपक जैन, महेश जैन आदी उपस्थित होते.



# माथेरानमधील मुख्य रस्त्यांचा दर्जा निकृष्ट

## पर्यटकांमध्ये नाराजीचा सूर

**माथेरान : प्रतिनिधी**

विविध शासकीय खात्यांची त्याचप्रमाणे पर्यावरण वाद्यांच्या कचाट्यात अडकलेल्या आणि नेहमीच आवश्यक विकास कामांना होत असलेला विरोध यामुळेच माथेरानमध्ये आजतागायत विकासाची गंगा येण्यासाठी विलंब होत आहे. नेहमीच्या रहदारीच्या मुख्य महात्मा गांधी मार्गावर पर्यटकांना चालण्यासाठी सुस्थितीत रस्ते नसल्याचे विदारक चित्र आणि किरकोळ अपघात होण्याच्या घटना वारंवार घडताना दिसत आहेत.

धूळ विरहित रस्त्यांना आणि मातीची धूप होऊ नये यासाठी एकमेव उत्तम पर्याय म्हणून सनियंत्रण समितीच्या परवानगीने दस्तुरी नाक्यापासून ते पांडे रोड आणि गावातील काही ठिकाणी मातीचे क्ले



पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात आले आहेत, परंतु मुख्य मार्गावर सातत्याने मोठया प्रमाणावर रहदारी असल्याने आणि काही निकृष्ट दर्जाचे क्ले पेव्हर ब्लॉक्सचा वापर करण्यात आल्यामुळे कच्चे ब्लॉक्स पावसाळी पाण्यात विरघळून गेल्याने बहुतांश ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत.या खड्डेमय रस्त्यातून मार्गक्रमण करताना अंदाज येत नाही त्यामुळे ब्लॉक्सच्या खड्ड्यात पाय मुरगळून नेहमीच किरकोळ अपघात घडत आहेत. यामुळे पर्यटकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

> **आम्ही नेहमीच सहकुटुंब येत आहोत, परंतु पर्यटन वाढीसाठी ज्या काही अभिप्रेत असणाऱ्या बाबी आहेत. त्या आजही दिसत नाहीत. शांत आणि प्रदूषणमुक्त स्थळ आणि त्यातच मुंबईपासून जवळ आहे म्हणून आम्ही येतो, पण रस्त्यांची अवस्था भयानक आहे. आम्हीसुध्दा या खड्डेमय रस्त्यातून पडताना सावरलो नसतो तर कदाचित हातपाय फॅक्चर झालाच असता निदान शासन, प्रशासन या स्थळाबाबतीत का उदासीन आहे हे समजत नाही.**
>
> **-अनुप मढवी, पर्यटक, मुंबई**

भले येथील बहुतांश महत्वाकांक्षी कामे न्यायप्रविष्ट असली तरीसुद्धा ज्या गावातील रस्त्यांचे साधे खड्डे बुजवू शकले जात नाहीत ते गाव विकसनशील पर्यटनक्षेत्र म्हणून नावारूपाला येऊ शकते का असाही प्रश्न पर्यटकांमधून उपस्थित केला जात आहे. सुप्रीम कोर्टाने ब्लॉक्सच्या रस्त्याला स्थगिती दिली आहे. रस्त्यावरील खड्डे भरण्यास तथा दुरुस्तीसाठी मनाई केली नाही त्यामुळे पालिकेने दिरंगाई करू नये, असे व्यापारी मंडळाचे म्हणणे आहे. त्यातच नगरपालिका सभागृहात लोकनियुक्त सदस्य नसल्याने इथले राजकारणी पदाशिवाय हालचाल करताना दिसत नाहीत.

माथेरानविषयी जे जे राजकीय पक्षांचे नेते आणि पर्यावरणवादी मंडळी नेहमीच खोट्या सहानुभूतीचा आव आणतात त्यांचे कधी माथेरान मध्ये आगमन झालेच तर त्यांना दस्तुरी पासून माथेरान रेल्वे स्टेशनपर्यंत पायी चालत आणणे गरजेचे बनले आहे. इथला नागरिक असो किंवा येणारा पर्यटक ज्यांना याठिकाणी कशाप्रकारे चालताना त्रास सहन करावा लागतो याचा प्रत्यय येईल.

## रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रात पाणीसाठा आणखी वाढला

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात पाणीसाठा वाढला असून २८ धरणक्षेत्रात सरासरी ८६.१७ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. गेल्या वर्षापेक्षा यावर्षी धरण क्षेत्रात पाणीसाठा जास्त आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १८ धरणे शंभर टक्के भरले आहेत. जिल्ह्यातील ५ धरणांमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध झाले असून लवकरात ही ५ धरणे १०० टक्के भरण्याच्या मार्गावर आहेत. जिल्ह्यातील १८ धरणक्षेत्रातून पाण्याचा विसर्ग होत आहे.

तीन धरण क्षेत्रात ७६ ते ९९ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील फक्त दोन धरणक्षेत्रात ५० टक्के पेक्षा कमी पाणीसाठा आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यातील श्रीगांव धरणात ३५ टक्के भरले असून दुसरे श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली धरणात १९ टक्के भरले आहे.

रायगड जिल्ह्यातील १०० टक्के भरलेला धरणांमध्ये रोहा तालुक्यातील सुतारवाडी, म्हसळा तालुक्यातील पाभरे, संदेरी, महाड तालुक्यातील खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, वरंध, सुधागड तालुक्यातील कोंडगांव, उन्हेरे, खालापूर तालुक्यातील भिलवले, कलोते मोकाशी, डोणवत, तळा तालुक्यातील वावा, मुरुड तालुक्यातील फणसाड, पेण तालुक्यातील



आंबेघर पनवेल तालुक्यातील उसरण आदी धरणांचा समावेश आहे या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

जिल्ह्यातील अन्य धरणांमध्ये श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी धरणक्षेत्रात ८८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील अवसरे धरणक्षेत्रात ७८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणक्षेत्रात ७६ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात ६४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील बामणोली धरणक्षेत्रात ८१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उरण तालुक्यातील पुनाडे धरणक्षेत्रात ५७ पाणीसाठा उपलब्ध, सुधागड तालुक्यातील ढोकशेत धरणक्षेत्रात ६५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरणक्षेत्रात ५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

## ई-रिक्षावरील नैसर्गिक आपत्तीची भरपाई देण्याची चालकांची मागणी

**नेरळ : प्रतिनिधी**

२ जुलै रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास ई रिक्षा चार्जिंग स्टेशनवरील ई रिक्षांवर अतिवृष्टीमुळे झाडाची मोठी फांदी पडल्यामुळे दोन ई रिक्षांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीचा भाग म्हणून संबंधित ई-रिक्षा धारकांना शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आता लागली आहे.

हातरीक्षाच्या अमानवीय प्रथेतून सुटका मिळावी म्हणून माथेरान शहरात ई-रिक्षाला परवानगी मिळाली. ९४ हातरीक्षा पैकी सध्या वीस श्रमिकांना ई रिक्षा मिळाल्यावर कुठेतरी ही श्रमिक मंडळी स्थिरस्थावर होऊन आपल्या कुटुंबाला आधार देण्याचा प्रयत्न करीत असतानाच झाडाची फांदी ई-रिक्षावर पडल्याने कविता बल्लाळ आणि प्रकाश सुतार यांच्या दोन ई रिक्षांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे काही दिवस दुरुस्ती



अभावी या ई रिक्षा बंद असणार आहेत. त्यामुळे त्यांची कौटुंबिक आर्थिक परिस्थिती नाजूक झाली असून त्यांना नैसर्गिक आपत्ती म्हणून शासनाने योग्य ती नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली जात आहे.

एकूण २० ई रिक्षांपैकी पंधरा ई-रिक्षा शालेय विद्यार्थ्यांना नियमितपणेने आण करीत असून उर्वरीत पाच ई रिक्षा पर्यटक आणि नागरिकांना सेवा उपलब्ध करून देतात तर काही वेळा दोन ते तीन ई रिक्षा खराब रस्त्यांमुळे नेरळ/पनवेल याठिकाणी दुरुस्तीसाठी नेल्या जातात. अशा परिस्थितीत प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून देणे ही एकप्रकारे तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यासाठी राज्य शासनाने उर्वरित ७४ परवाना धारक हातरीक्षा मालकांना ई रिक्षा उपलब्ध करून दिल्यास सर्वच अडचणी दूर होऊन पर्यटन वाढीस मदत होईल अशी मागणी होत आहे.

> **ई-रिक्षाला १० जून रोजी एक वर्ष पूर्ण झाले. आम्ही नियमितपणे कर्जाचे हप्ते भरत आहोत. खराब रस्त्यांमुळे या वाहनांची सतत डागडुजी करावी लागते त्यातच ही नैसर्गिक आपत्ती ओढवल्यामुळे आमची आर्थिक परिस्थिती बेताची बनली आहे त्यासाठी स्थानिक प्रशासनाने नुकसानभरपाई द्यावी.**
>
> **-प्रकाश सुतार, ई-रिक्षाचालक**

## कर्जत नगर परिषद क्षेत्रातील समस्यांबाबत शिवसेनेचे निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी, स्वच्छता, आरोग्य, रस्ते आणि वीज या महत्त्वपूर्ण समस्या तात्काळ सोडवाव्यात यासाठी कर्जत शहर शिवसेनेच्या वतीने नगरपरिषद यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले.

माजी नगरसेवक संकेत भासे, कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, पंकज पाटील, संजय मोहिते, रमाकांत जाधव, प्रदीप वायकर, नदीम खान, भरत बामणे, अशोक मोरे, मोहन भोईर, योगेश पोथरकर, संदेश मोरे आदींनी निवेदन दिले. कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड यांनी निवेदन स्वीकारले.

या मागणी निवेदनात अनेक भागांमध्ये पाण्याचा असमर्थित पुरवठा, तुंबलेली गटारे आणि निचऱ्याचा अभाव, डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांचा धोका, विजेची अति ढळलेली समस्य, खड्यात गेलेले रस्ते या सर्व समस्यांवर तात्काळ कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली. 'नागरिकांना दिलासा मिळावा आणि शहरात स्वच्छ व सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे, हीच आमची भूमिका असल्याचे संकेत भासे यांनी स्पष्ट केले.



## महाड रोटरी अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



**महाड : प्रतिनिधी**

रोटरी अकॅडमी महाडच्या जे.ई.ई, नीट आणि सी.ई.टी यांसारख्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात रोटरी स्कूलचे चेअरमन बिपीनदादा पाटणे यांच्या हस्ते प्रमुख मान्यवर डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, नीता शेठ, प्रदीप शेठ व अपूर्वा देसाई, मुख्याधिपीका भुमिका पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत रोटरी अकॅडमी महाडच्या जे.ई.ई, नीट आणि सी.ई.टी यांसारख्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा बीएस बुटाला हॉल महाड येथे झाला.

या सत्कार सोहळ्यातील गुणवंतांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये अर्चना पाटील, इशा गायकवाड, सार्थक सोनकर, श्रावणी भिलारे, मृण्मयी चितळे, यश माळी, तन्वी जैन इरफान मसिहुद्दीन, समृद्धी कुडाळकर, तेजस भगत, स्वराली लाड, स्मित काकडे, गार्गी जंगम, सिया पोतदार, कस्तुरी पवार, आदित्य कदम, प्रसाद गोगावले आदींना गौरविण्यात आले.

या वेळी प्रमुख मान्यवर मा. डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, नीता शेठ आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

## आदिवासी समाजातून वकील झाल्याबद्दल रमेश पवारांचा सत्कार

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा हद्दीतील घोडपापड आदिवासी वाडीतील रहिवासी आणि आदिवासी समाजाचे नेते रमेश पवार यांनी नुकतीच कायद्याची पदवी मिळवली आहे. अविरत परिश्रम, जिद्द, चिकाटीच्या जोरावर रमेश पवार वकील झाले.

खडतर परिस्थितीवर मात करीत आदिवासी समाजातून चांगल्या गुणांनी कायद्याची पदवी मिळवून वकील झालेले रमेश पवार हे समस्त तरुणांसाठी आयडॉल असल्याचे गौरवोद्गार लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचे राज्य अध्यक्ष, नामवंत उद्योजक, तथा ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय सोनावणे यांनी काढले.

सत्कारावेळी बक्षीस व पहिल्या कामाचा मोबदला म्हणून एक धनादेशदेखील या वेळी सुपूर्द केला. आदिवासी समाजातील होतकरू तरुण एल एल बी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून, सामाजिक संस्था संघटना यांच्याकडून सत्कार होत आहे.



## रायगड जिल्हा परिषद वावंढळ शाळेत पालक मेळावा उत्साहात

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा वावंढळ येथे शाळेचा पालक मेळावा, पालक आणि विद्यार्थी यांच्या उपस्थित झाला. या मेळाव्यासाठी शाळेमध्ये उपस्थित पालकांचे स्वागत करण्यात आले.

मेळाव्यामध्ये विद्यार्थी उपस्थिती, विविध शासकीय योजना, शालेय शिस्त, वैयक्तिक स्वच्छता, पालक व शाळा संपर्क, शालेय बचत बँक, विविध शालेय समिती यांची रचना या विषयांवर चर्चा करण्यात आली. पालकांमध्ये वरील विषयासंदर्भात



जनजागृती व्हावी यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी चला चला जीवनाचे सोने करूया हे स्वरचित पथनाट्य सादर केले.

पालक मेळाव्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य व निमंत्रित पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते, तसेच माजी सरपंच व माजी समिती अध्यक्ष अर्जुन कदम यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खालापूर तालुका संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. पालक मेळावा उद्बोधक व उत्साह पूर्ण वातावरणात झाला.

# माणगाव उतेखोल येथे रानभाजी प्रदर्शन

## जिल्ह्यातील २५ आदिवासी वाड्या-पाड्यांतील १०० वनवासींचा सहभाग

**माणगाव : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम संचालित कै. विजया गोपाळ गांधी अनुदानित आश्रम शाळा उतेखोल माणगाव येथे गुरुवारी (दि.३) रानभाजी प्रदर्शन झाले. या रानभाजी प्रदर्शनात रायगड जिल्ह्यातील २५ आदिवासी वाड्या पाड्यावरून १०० वनवासी बांधवांनी सहभाग घेतला होता.

विविध रानभाज्यांची माहिती सहभागी पालकांनी मोठ्या उत्साहात सांगितली. रायगड जिल्ह्याच्या वनांमध्ये सुमारे पन्नासहून अधिक रानभाज्या पावसाळ्यात उपलब्ध होतात. आदिवासी बांधवांनी



रानभाज्यांचे औषधी गुणधर्म संदर्भासहित सांगितल्याने मान्यवरांनी सर्वांचे कौतुक केले. महोत्सवासाठी माणगाव तालुका कृषी अधिकारी रविकिरण कावळे, बिट कृषी अधिकारी पडवळकर, संकुल समिती सहसचिव नितीन चांदोरकर, संकुल समिती सहसचिव रवी पाटील, माध्यमिक शालेय समिती सदस्य लक्ष्मण जंगम, प्राथमिक शालेय समिती सदस्या प्रतिभा पोळेकर, तालुका सचिव मनोज कामत, सुरेश गोखले, पालक प्रतिनिधी गोविंद लेंडी, उमेश जाधव व पालक आदी उपस्थित होते.

तालुका कृषी अधिकारी कावळे यांनी सांगितले की, शहरी भागामध्ये रानभाज्यांचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात झाला पाहिजे. त्यासाठी लागेल ती मदत उपलब्ध करू व रानभाज्या प्रसारासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. रानभाज्या प्रदर्शना बरोबरच शाळेचा पालक मेळावा झाला. पालक मेळाव्यानंतर माता पालक व शिक्षक पालक संघाचे पदाधिकारी यांनी नगरपंचायत माणगाव येथे जाऊन आश्रम शाळेच्या जवळ असलेला कचरा डेपो हलवावा यासाठी निवेदन दिले.

# दुसऱ्या कसोटीत भारत मजबूत स्थितीत

## कर्णधार गिलचे शतक; इंग्लंडविरोधात चारशे पार धावांची आघाडी

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी भारताने आपल्या आघाडीला अधिक भक्कम करत इंग्लंडवर वर्चस्व राखले आहे. करुण नायर लवकर बाद झाल्यानंतर केएल राहुल आणि कर्णधार शुभमन गिलने डाव सावरत संयमाने फलंदाजी केली. गिलने शतक ठोकले, तर राहुलने नाबाद अर्धशतकी खेळी साकारली. उपकर्णधार ऋषभ पंतनेही वेगवान शतक केले.

चौथ्या दिवसाची सुरुवात भारतासाठी संमिश्र झाली, जेव्हा संघाला गरज होती तेव्हा करुण नायर अवघ्या २६ धावांवर बाद झाले. इंग्लंडच्या ब्रायडन कार्सच्या अचूक लेंथच्या चेंडूवर नायरने चेंडूला बाहेर खेळत ऑफ साईडला झेल दिला आणि जेमी स्मिथने स्लिपमध्ये कोणतीही चूक न करता झेल घेतला. नायरने काही आक्रमक फटके जरूर मारले, पण एकंदरित खेळात आत्मविश्वासाचा अभाव स्पष्ट दिसून आला.

करुण नायर बाद झाल्यावर शुबमन गिलने केएल राहुलसोबत डाव सांभाळला. राहुलने आपल्या नेहमीच्या शैलीत सुंदर कव्हर ड्राइव्ह, स्क्वेअर कट आणि वेळोवेळी झुकून खेळत धावसंख्या पुढे नेतली. काही वेळा चेंडू स्लिपमध्ये गेला, पण राहुलने संयम न सोडता खेळ सुरू ठेवला. राहुल ५५ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार गिल आणि उपकर्णधार ऋषभ पंत यांनी सूत्रे हाती घेतली. पंत आक्रमक खेळताना दिसून आला आणि ५८ चेंडूत ६५ धावा करून बाद झाला. त्याच्या अर्धशतकी खेळीत आठ चौकार व तीन षटकारांचा समावेश होता. मग गिलने शतकी खेळी साकारली. त्याची ही खेळी नऊ चौकार व तीन षटकारांनी सजली होती. शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा भारताने इंग्लंडवर ४००हून अधिक धावांची भक्कम आघाडी घेतली आहे.



चौथ्या दिवसाच्या खेळात सुरुवातीला थोडेसे ढगाळ वातावरण होते, ज्यामुळे चेंडूला स्विंग मिळू शकते, असे अंदाज होते. तरीही खेळपट्टी अजूनही फलंदाजांना अनुकूल आहे. चेतेश्वर पुजारा यांच्या म्हणण्यानुसार खेळपट्टीवर फारसे झिजलेपण दिसत नाही आणि अजूनही भरपूर धावा होऊ शकतात.

भारत सध्या पूर्णपणे वर्चस्वात असून त्यांची योजना स्पष्ट दिसते ती म्हणजे मोठी आघाडी मिळवून इंग्लंडसमोर अंतिम दिवशी ४००पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य ठेवायचे. केएल राहुल आणि शुभमन गिलची भागीदारी भारतासाठी निर्णायक ठरणार आहे.

भारत मजबूत स्थितीत असून इंग्लंडला विजयासाठी चमत्कार करावा लागेल. चौथ्या दिवसाच्या अखेरीस भारताने ४००+ धावांची आघाडी घेतली आहे. त्यामुळे इंग्लंडला फलंदाजीस आल्यावर अवघड होऊ शकते.

# वर्ल्ड चॅम्पियन गुकेश 'रॅपिड' प्रकारात विजेता

**झाग्रेब : वृत्तसंस्था**

बुद्धिबळच्या रॅपिड आणि ब्लिट्सझ या प्रकारातील कमजोर खेळाडू म्हणून हिणवल्या गेलेल्या भारताच्या डी गुकेशने या स्पर्धेतील रॅपिड प्रकाराचे जेतेपद पटकावले आहे. सध्याचा वर्ल्ड चॅम्पियन असलेल्या डी गुकेशने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर आपले वर्चस्व गाजवले.

क्रोएशियातील झाग्रेब येथे झालेल्या ग्रँड चेस टूर २०२५ रॅपिड अँड ब्लिट्झमध्ये रॅपिड जेतेपद गुकेशने आपल्या नावे केले. गुकेशला मॅग्नस कार्लसनने या स्पर्धेतील कमजोर खेळाडू असे हिणवले होते, पण आता या स्पर्धेतील रॅपिड प्रकारात अव्वल क्रमांक मिळवला आहे. कार्लसनला या स्पर्धेतील चौथ्या फेरीत पराभूत करून त्याच्या वाक्याचे गुकेशने चोख प्रत्युत्तर दिले होते.

१९ वर्षीय गुकेशने उत्कृष्ट कामगिरी आणि जबरदस्त फॉर्म दाखवत १८पैकी १४ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. त्याने अंतिम फेरीतही उत्कृष्ट कामगिरी केली आणि विजेता ठरला. गुकेशच्या या स्पर्धेतील मोहिमेची सुरूवात पराभवाने झाली. पहिल्या फेरीत त्याला जॅन क्रिज्स्टोफ दुडाकडून पराभव पत्करावा लागला, पण या पराभवामुळेच गुकेशने अजून जोमाने मेहनत करत पुढच्या सामन्यांमध्ये विजय मिळवला.

पहिल्या पराभवानंतर गुकेशन सलग पाच



विजयांची आश्चर्यकारक मालिका कायम ठेवली, ज्यामध्ये चौथ्या फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या मॅग्नस कार्लसनला त्याने पुन्हा एकदा पराभवाचा दणका दिला. यामुळे तो आघाडीवर पोहचला आणि स्पर्धेत त्याची पकड मजबूत झाली.

सातव्या आणि आठव्या फेरीत अनिश गिरी आणि क्रोएशियाच्या इव्हान एरिकविरुद्ध बरोबरी साधल्यानंतर गुकेशने अंतिम फेरीत रॅपिड सेक्शनमध्ये वेस्ली सोवर महत्त्वपूर्ण विजय मिळवला.

२०२५च्या ग्रँड चेस टूरमधील तिसरा टप्पा हा ब्लिट्झ विभागातील सुपरयुनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ शनिवारी सुरू होऊन ६ जुलै रोजी संपेल. रॅपिड आणि ब्लिट्झ दोन्ही फॉरमॅटमधील एकत्रित गुण स्पर्धेचा एकूण विजेता निश्चित करतील.

## दिघोडे येथील अवनी कोळीची आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील दिघोडे गावची कन्या अवनी अलंकार कोळी हिची १४ ते २८ ऑगस्टदरम्यान कझाकिस्तानमध्ये होणाऱ्या आशियाई शुटिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अशा प्रकारे डबल ट्रॅप शॉटगन ज्युनिअर वूमन नेमबाजीसाठी रायगड व नवी मुंबईतून भारतीय संघात निवड झालेली अवनी ही पहिलीच नेमबाज आहे.

अवनी ही सामान्य घरातील, पण तिची कामगिरी असामान्य आहे. चे वडील अलंकार कोळी हेही राष्ट्रीय नेमबाज व उत्तम शुटिंग कोच असल्याने त्यांनी आपल्या कन्येला या क्षेत्रात प्रोत्साहन दिले. अवनीचा छोटा भाऊ अर्णवदेखील वडिलांचा वसा चालवत आहे.

अवनीने आतापर्यंत अनेक स्पर्धांमधून सुवर्ण, रौप्य, कांस्यपदके जिंकली आहेत. तिची आता आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने समाजातील विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उरणमधील तीन क्रिकेटपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**उरण : बातमीदार**

५० बॉल्स क्रिकेट फेडरेशन ऑफ इंडियामार्फत ओडिशातील भुवनेश्वर येथे ११ ते १५ जुलैदरम्यान नॅशनल चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र स्टेट असोसिएशनतर्फे घेतल्या गेलेल्या निवड चाचणीमध्ये उरण तालुक्यातील सेवेन स्टार क्रिकेट अकॅडमीच्या तीन खेळाडूंची मुंबई डिव्हिजन अंडर-१९ संघात निवड झाली आहे.

दुर्गेश रवींद्र कोळी, रितुराज रमेश सरोज, अभिजित कुमार चंद अशी निवड झालेल्या खेळाडूंची नावे आहेत. याबद्दल प्रशिक्षक प्रवीण तोगरे, मयूर कदम व तनिष्क तोगरे यांनी आनंद व्यक्त केला. तिघेही खेळाडू गेल्या एका वर्षापासून या केंद्रातून मार्गदर्शन घेत आहेत व आपल्या परिश्रमाने राष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या चॅम्पियनशिपमध्ये आपली छाप पाडतील, असे विश्वास प्रवीण तोगरे यांनी विश्वास व्यक्त केला आहे.

## ऐरोलीत राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

मास्टर प्रतीक तुलसानी महाराष्ट्र राज्य रँकिंग टेबल टेनिस मानांकन स्पर्धा ६ ते १० जुलैदरम्यान ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनच्या संकुलात आयोजित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशन व ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या स्पर्धेत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्पर्धक सहभागी होणार आहेत.





## इंग्लंडमध्ये वैभवचा बोलबाला!

■ तीन सामन्यांत चोपल्या १७९ धावा

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय १९ वर्षांखालील संघातील स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी सध्या तुफान फॉर्ममध्ये आहे. भारताचा १९ वर्षांखालील संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. या दौऱ्यावर १४ वर्षीय फलंदाज वैभवच्या दमदार फलंदाजीचा बोलबाला पहायला मिळाला आहे.

या मालिकेतील तिन्ही सामन्यांमध्ये भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचा बोलबाला दिसून आला आहे. आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जाणाऱ्या वैभवने आयपीएल स्पर्धेत धावांचा पाऊस पाडल्यानंतर आता भारतीय संघासाठीदेखील धावांचा पाऊस पाडला आहे. वैभव या मालिकेत भारतीय संघाकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे, तर या मालिकेत सर्वाधिक धावा करणारा तो दुसरा फलंदाज आहे. पुढील दोन्ही सामन्यांमध्ये त्याच्याकडून आणखी चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे.

वैभवने आयपीएल २०२५ स्पर्धेत आपल्याच पहिल्याच हंगामात फलंदाजी करताना षटकारांचा पाऊस पाडला होता. आता इंग्लंडविरूद्ध सुरू असलेल्या वनडे मालिकेतही त्याने षटकारांची मालिका सुरुच ठेवली आहे. त्याने तीन सामन्यांमध्ये १७ षटकार मारले आहेत. तो या मालिकेत सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाजदेखील आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात फलंदाजी करताना त्याने १९ चेंडूंचा सामना करत तीन चौकार आणि पाच षटकारांच्या साहाय्याने ४८ धावांची खेळी केली होती. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात त्याने ३४ चेंडूंचा सामना करत ४५ धावांची खेळी केली, तर तिसऱ्या सामन्यात त्याने ८६ धावांची खेळी केली.

भारतीय संघाने पाच वनडे सामन्यांच्या मालिकेतील दोन सामने जिंकले आहेत, तर इंग्लंडने एक सामना जिंकला आहे. भारतीय संघ २-१ने आघाडीवर आहे.

## पॅट कमिन्सने घेतला भन्नाट झेल



**ग्रेनेडा :** ऑस्ट्रेलियाचा संघ सध्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. दुसऱ्या सामन्यात विंडीजच्या केसी कार्टीला बाद करण्यासाठी 'कांगारूं'चा कर्णधार पॅट कमिन्सने भन्नाट झेल घेतला.

वेस्ट इंडिजची फलंदाजी सुरू असताना केसी कार्टी फलंदाजी करत होता. त्यावेळी नववे षटक टाकण्यासाठी कर्णधार पॅट कमिन्स गोलंदाजीला आला. या षटकातील दुसरा चेंडू कार्टीने डिफेन्स करण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बॅटची कडा घेत हवेत गेला. त्यावेळी गोलंदाजी करत असलेल्या कमिन्सने डाव्या बाजूला धावत जाऊन डाईव्ह मारली आणि एका हाताने भन्नाट झेल घेतला.

# बुमराहच्या अनुपस्थितीत सिराज ठरला हिरो

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुसऱ्या कसोटीत इंग्लंडचा संघ पहिल्या डावात ४०७ धावांवर सर्वबाद झाला. मोहम्मद सिराजच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर इंग्लंडचे फलंदाज झटपट तंबूत परतले. सिराजने पहिल्या डावात सहा विकेट्स घेत भारतीय संघाला १८० धावांची मोठी आघाडी मिळवू दिली.

हॅरी ब्रुक आणि जेमी स्मिथ यांनी दीडशे धावा करत ३०० धावांची भागादारी रचत भारताला सामन्यापासून दूर नेण्याचा प्रयत्न करत होते. आकाशदीपने हॅरी ब्रुकची विकेट घेत ही भागीदारी तोडली आणि मग सिराजने त्याच्या मदतीने



इंग्लंडच्या उर्वरित फलंदाजांना झटपट माघारी धाडले.

मोहम्मद सिराजने दुसऱ्या दिवशी जॅक क्रॉलीला झेलबाद करत पहिली विकेट मिळवली. यानंतर तिसऱ्या दिवशी सिराजने दोन चेंडूत दोन विकेट्स घेत भारताला चांगली सुरुवात करून दिली. सिराजने पहिल्यांदा जो रूटला झेलबाद करवत दुसरी विकेट मिळवली. यानंतर संघाचा कर्णधार बेन स्टोक्सला कमालीच्या बाऊन्सने गोल्डन डकवर झेलबाद केले. यासह त्याच्या तीन विकेट्स पूर्ण झाल्या.

यानंतर सिराजने ब्रायडन कार्स, जोश टंग आणि शोएब बशीर यांना शून्यावर बाद करत सहा विकेट्स मिळवले. सिराजने आधी ब्रायडन कार्सला पायचीत केले. यानंतर जोश टंगला पायचीत केल्याचे अपील केल्यानंतर पंचांनी बाद दिले नाही. यानंतर रिव्ह्यू घेण्यात आला, तिसऱ्या पंचांचा निर्णय मात्र सिराजच्या बाजूने लागला आणि त्याला पाचवी विकेट मिळाली. इंग्लंडमध्ये त्याचा हा पहिला, तर कसोटी क्रिकेटमधील चौथा फायफर होता.

पाच विकेट घेतल्यानंतर सिराजने शोएब बशीरला क्लीन बोल्ड करत इंग्लंडला सर्वबाद केले. यानंतर सिराजने त्याचे स्पेशल Siuuu सेलिब्रेशन केले आणि चेंडू दाखवत मैदानाबाहेर गेला. बुमराहने त्याला मिठी मारत त्याचे कौतुक केले. सिराजने या सामन्यात १९.३ षटके टाकत ७० धावा देत सहा विकेट्स घेतल्या, ज्यात तीन षटके निर्धाव होती.

# कधी हरभजन सिंग, तर कधी शेन वॉर्न!

## इशान किशनच्या गोलंदाजीने वेधले लक्ष





**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळवली जात असताना भारताचे इतर अनेक खेळाडू काऊंटी क्रिकेटमध्ये खेळत आहेत. काऊंटीमध्ये भारतीय खेळाडूंनी आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. यादरम्यान इशान किशन त्याची फलंदाजी नाही, तर गोलंदाजीमुळे तो सध्या चर्चेत आहे. इशानच्या गोलंदाजीमध्ये अनेक दिग्गजांची गोलंदाजी अॅक्शन पाहायला मिळाली आहे.

काउंटी चॅम्पियनशिपच्या चालू हंगामातील पहिल्या दोन डावांमध्ये त्याने अनुक्रमे ८७ आणि ७७ धावा केल्या आहेत. यानंतर त्याने गोलंदाजीमध्ये आपला हात आजमवला. ज्यामध्ये त्याने सहा वेगवेगळ्या गोलंदाजी अॅक्शनसह सहा चेंडू टाकले, ज्याचा व्हिडीओ काऊंटी चॅम्पियनशिपच्या पेजवर शेअर करण्यात आला आहे.

सोमरसेट विरुद्धच्या सामन्यात इशान किशन गोलंदाजी करण्यासाठी आला होता. त्याने षटकातील पहिला चेंडू हरभजन सिंगच्या अॅक्शनने टाकला. नंतर तर तो दिग्गज फिरकी गोलंदाज शेन वॉर्नची नक्कल करत लेग-स्पिन गोलंदाजी करतानाही दिसला. खरंतर या सामन्यात किशन विकेटकीपिंग करत होता, पण डावाच्या मध्येच दुसऱ्या खेळाडूला ग्लोव्हज दिले आणि चेंडू घेऊन गोलंदाजीसाठी पोहचला.

ईशान किशन विकेटकिपिंग सोडून गोलंदाजीसाठी पोहचताच चाहत्यांना धोनीची आठवण आली. २०१४मध्ये धोनीही अचानक ग्लोव्हज काढून गोलंदाजी करताना दिसला होता. इशान किशनने सहा चेंडू सहा वेगवेगळ्या गोलंदाजी अॅक्शनमध्ये केले आहेत. चाहत्यांनीही इशानच्या या व्हिडीओवर खूप कमेंट्स केल्या आहेत.

## जलद दोन हजार धावांमध्ये जैस्वालची द्रविड, सेहवागशी बरोबरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतील दुसऱ्या डावात भारतीय संघातील युवा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल २८ धावा करून बाद झाला, पण त्याच्या नावे एका विक्रमाची नोंद झाली आहे. यामध्ये त्याने वीरेंद्र सेहवाग आणि राहुल द्रविड या दिग्गज फलंदाजांची बरोबरी केली आहे.

यशस्वी जैस्वालने आपल्या ४०व्या डावात कसोटी क्रिकेटमध्ये दोन हजार धावांचा पल्ला गाठला आहे. वीरेंद्र सेहवाग आणि राहुल द्रविड यांनीदेखील हा पल्ला तेवढ्याचा डावांत गाठला होता. विजय हजारे आणि गौतम गंभीर यांनी हा कारनामा ४३व्या, सुनील गावसकर आणि सचिन तेंडुलकर यांनी ४४व्या डावात, माजी कर्णधार सौरव गांगुली यांनी ४५व्या डावात, तर चेतेश्वर पुजाराने ४६व्या डावात केला होता.

यशस्वी जैस्वालला पहिल्या डावात शतक झळकावण्याची संधी होती, पण तो ८७ धावांवर माघारी परतला. त्यानंतर दुसऱ्या डावातही त्याला चांगली सुरुवात मिळाली होती, मात्र इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोश टंगने टाकलेला चेंडू टप्पा पडून आत आला आणि यशस्वीला पायचीत करून गेला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com